


म. ग्रं. सं. ठा.
विषय काव्य
सं. नं. १२५०.
REFBK-0005628
REFBK-0005628

# सु नी ति का

## कुमुदबान्धव

यांच्या सुनीतांचा सङ्ग्रह

४६२८

REFBK-0005628

REFBK-0005628

रामकृष्ण प्रकाशन मंडळ

मुंबई नं. ४

प्रकाशक
कृष्णाजी नारायण सापळे
१५-१७ त्रिभुवनरोड, मुंबई नं. ४

[ पुनर्मुद्रण, भाषांतर वगैरे सर्व प्रकारचे हक्क लेखकाचे स्वाधीन आहेत ]

प्रथमावृत्ति-सप्टेंबर १९३७

किंमत एक रुपया

मुद्रक
कृष्णाजी नारायण सापळे
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस
१५-१७ त्रिभुवनरोड, मुंबई नं. ४

प्रिय पत्नी

सौ. इन्दिरेस

# सुनीतिका

—म्हणजे आजपर्यंतच्या माझ्या सर्व सुनीतांचा संग्रह होय.

‘ कुमुदबान्धव ’ या माझ्या प्रथम काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झालेलीं सुनीतें पुनः सुधारलीं असून त्या संग्रहांतील इतरहि कांहीं कवितांचें सुनीतांत रूपांतर केलें आहे.

प्रस्तुत संग्रहांतील ‘ समदुक्खी ’ [ पृष्ठ ५१ ] या सुनीताची कल्पना एका इंग्रजी कवितेवरून सुचली आहे. शेवटली ‘ कलाटणी ’ मात्र सर्वस्वी स्वतंत्र आहे.

सुविख्यात साहित्यपंडित, माझे सन्मान्य स्नेही श्री. के. नारायण काळे यांनीं विस्तृत, उत्कृष्ट प्रस्तावना लिहून देऊन मला ऋणी केलें आहे.

‘ सुनीतिके ’च्या बाबतींत माझ्या अनेक प्रेमळ सुहृदांचें मला निरपेक्ष सहाय्य झालें आहे. विशेषतः मित्रवर्य श्री. शं. कृ. देवभक्त, कवि ‘ यशवंत, ’ कवि ‘ अज्ञातवासी, ’ प्रो. ज. नी. उर्फ बापूसाहेब कर्वे, श्री. र. गो. सरदेसाई यांनीं बहुमोल सूचना केल्या. सुप्रसिद्ध कल्पक चित्रकार श्री. पु. श्री. काळे यांनीं, सुनीतिके ’चें बाह्यांग सजविण्यासाठीं सुंदर चित्र काढून दिलें. रामकृष्ण प्रकाशन मंडळाचे मालक श्री. कृ. ना. सापळे यांनीं ‘ सुनीतिका ’ प्रकाशांत आणून आपुलकी दाखविली. या सर्वांचे आभार कोणत्या शब्दांत मानावेत हेंच कळत नाहीं. पण आभारांच्या औपचारिक परतफेडीनें त्यांच्या स्नेहऋणांतून मी मुळींच मुक्त होऊं इच्छित नाहीं.

ताराबाग<br>मुंबई नं. ४

कुमुदबान्धव

# प्रस्तावना

पाश्चिमात्य वाङ्मयाच्या परिचयामुळें मराठी कवितेच्या क्षेत्रांत ज्या महत्त्वाच्या उपक्रमांची भर पडली आहे, त्यांमध्यें सुनीत या काव्यप्रकाराला बरेंच महत्त्वाचें स्थान द्यावें लागेल. चवदा चरणांच्या मर्यादेनें निगडित झालेल्या विशिष्ट प्रकारच्या कवितेचें "सुनीत" हें नामकरण, जरी बरेंचसें अलीकडचें असलें, तरी तशा प्रकारच्या कवितेचा पायंडा, आधुनिक कवितेच्या जनकांनींच पाडला असल्यामुळें, मराठी वाचकांशीं झालेला त्याचा परिचय, आधुनिक कवितेइतकाच जुना आहे. तरी पण सुनीत हा काव्यप्रकार, मराठींत इतकीं वर्षें प्रचलित असूनही, कविवर्गाकडून त्याची विशेष जोरानें जोपासना मात्र झालेली दिसत नाहीं. याचें एक कारण, कदाचित्, ज्या इंग्रजी कवींच्या कृतींनी मराठी कवींना सॉनेट्चें मराठीकरण करण्याची स्फूर्ति दिली, त्यांच्या कर्त्यांनाच या काव्यप्रकाराच्या सामर्थ्याबद्दल कांहींशी साशंकता वाटत असलेली आढळते, हें असण्याचा संभव आहे. सॉनेट् या काव्य-प्रकाराबद्दल, इंग्रजी कवींना अभिमान व प्रेम वाटत असलें, तरी त्याची शक्ति व लौकिक परिणामकारकता यांबद्दल त्यांना तेवढासा विश्वास वाटत नसावा, असें बहुतेक इंग्रजी कवींनीं सॉनेट्बद्दल ठिकठिकाणीं जे उद्गार काढले आहेत, त्यांवरून अनुमान निघतें. सॉनेट्बद्दलच्या त्यांच्या त्या उद्गारांत कळकळीची पराकाष्ठा प्रकट होत असली, तरी त्याच वेळीं त्यांमधून एक प्रकारची क्षमायाचक वृत्ति तितक्याच उघडपणें प्रतीत होत असल्यामुळें, या काव्यप्रकारामध्यें कांहींतरी गौणता आहे, असें त्यांनाही वाटत असावें कीं काय, अशी शंका येते. वर्ड्स्वर्थ् सॉनेट्ची तरफदारी करतांना, त्याबद्दल "Melody of small lute;" "A trumpet," "Key" असे लघुतावाचक शब्द वापरतो, तर जॉन ॲडिंग्टन् सिमन्ड्स्, हा त्याचें "Thought's pure diamond.

With fourteen facets scattering fire and light "
असें वर्णन करतो. हाच प्रकार इतर कवींचाही आहे. ज्यांचें अनुकरण करावयाचें, त्यांचीच जर सुनीताबद्दल अशी साशंक दृष्टी, तर अनुकरण करणाऱ्यांमध्यें त्याबद्दलच्या विश्वासाचा अभाव आणखी जास्त प्रमाणांत दिसून आला तर काय नवल? वास्तविक पाहातां, हा काव्यप्रकार मराठी कवितेंत प्रचलित झाल्यापासून जवळजवळ अर्धशतक उलटून गेलें आहे. बहुतेक सर्व आधुनिक कवींनीं कमीजास्त प्रमाणांत त्याचा वापर केला आहे. परंतु केवळ सुनीतलेखनामुळेंच ज्यानें असाधारण प्रसिद्धि मिळविली आहे, असा एकही कवि मराठींत अस्तित्वांत असल्याचें आढळत नाहीं. आणि फक्त सुनीतांचाच ज्यांत अंतर्भाव झालेला आहे, असा श्री. अधिकारीकृत एकच कवितासंग्रह अस्तित्वांत असलेला दिसून येतो; या दृष्टीनें पाहातां, पूर्णपणें सुनीतमय अशी श्री. स. अ. शुक्ल उर्फ कवि कुमुदबांधव यांची ही " सुनीतिका " आपल्या परीनें विशेष आहे, असेंच म्हटलें पाहिजे.

" सुनीत " हा काव्यप्रकार, मराठींत इंग्रजी कवितेच्या परिचयामुळें अवतीर्ण झाला असला, तरी खुद्द इंग्रजींतही, तो पूर्णपणें स्वदेशी नसून, बाहेरूनच आयात केलेला आहे. या काव्यप्रकाराचें मूलस्थान दक्षिण यूरप हें असून, तेथें तो पूर्णपणें विकसित झाल्यावर, इंग्लंडमधील वायट् व सरे या कवींनीं, त्याचें स्वभाषेंत आरोपण केलें. सिसिलीमधील मेंढपाळ, आपल्या मेंढरांचे कळप डोंगरांच्या उतरणीवर चरणीला लावून, विश्रांति घेत पडलेले असतांना, मनोविनोदनासाठीं, त्या मेंढरांच्या गळ्यांतील " सॉनेंलो " नांवाच्या क्षुद्रघंटांच्या नादावर जीं भावगीतें आलपीत असत, त्यांपासून " सॉनेट् " या इटालियन काव्यप्रकाराची उत्पत्ति झाली असावी अशी एक उपपत्ति साहित्यशास्त्री देत असतात. ती कितपत खरी आहे, याची येथें चर्चा करण्याचें कारण नाहीं; पण सॉनेट् या काव्यप्रकाराची रचनापद्धति आणि त्याचें अंतरंग या दोन्ही दृष्टींनीं तो गोपगीतांच्या स्वरूपांशीं अत्यंत विसदृश आहे, हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे. सॉनेट्ची रचना अत्यंत गुंतागुंतीची असून त्याचे विषयही उत्कट नागर भावनांची अभिव्यक्ति करणारे असतात. सहजस्फूर्त भावनोद्रेकापेक्षां, सुसंस्कृत आणि उदात्त अशा विचार-कल्लोलांचाच, त्यांमध्यें अधिक

प्रभाव दिसतो. यामुळें सॉनेट्ची परंपरा, ऐतिहासिकदृष्ट्या जरी यदाकदाचित् एकाद्या विशिष्ट गोपगीतांच्या प्रणालीपर्यंत नेऊन पोहोंचवितां येण्यासारखी असली, तरी आजच्या सॉनेट्चें, त्याच्या सॉनेलोरूपी पूर्वजाशीं, नांवापुरतेंच नातें उरलें असून, त्या दोघांच्या तोंडवळ्यामध्यें कांहींच साम्य राहिलें नाहीं, असें आढळून येईल.

पेट्रार्क् व डांटे, या कुशल बागवानांच्या मशागतीनें वाढलेलें सॉनेट्चें रोपटें, दक्षिण यूरोपांतून सरे व वायट् यांनीं इंग्लंडमध्यें आणल्यावर लवकरच, इतरही अनेक इंग्लिश कवींनीं, या विलायती–फुलझाडाची लागवड करून त्याच्या भरदार ताटव्यांनी आपल्या काव्याचे बगीचे सजविण्यास सुरुवात केली. स्वाभाविकच इंग्लंड्च्या हवापाण्याचा परिणाम त्याच्यावर होऊं लागला आणि त्याच्या मूलस्थानांतलें त्याचें पहिलें स्वरूप, जसेंच्या तसें कायम राहाणें अशक्य झालें. व्यक्ति तितक्या प्रकृति या न्यायानें, हरएक बागवान त्याची शोभा वाढविण्यासाठीं, स्वतःच्या कल्पनेप्रमाणें, त्याचा विकास करण्याच्या प्रयत्नाला लागला आणि अखेरीस त्या सगळ्यांच्या वेगवेगळ्या प्रयत्नांतून आणि प्रयोगांतून, सॉनेटचे इतके प्रकार आणि इतक्या परी निर्माण झाल्या कीं, त्यांमध्यें त्याच्या मूळच्या स्वरूपाची ओळख पटणेंही कित्येक वेळां मुष्कील होऊं लागलें. सॉनेट् लिहिण्यांत, वायट् व सरे यांची एक तऱ्हा, तर स्पेन्सरची दुसरीच. शेक्स्पीअरनें तर आपला तृतीयपंथच निर्माण केला. त्यानें पेट्रार्क व डांटे यांच्या विदेशी सॉनेट्चें सपशेल स्वदेशीकरण केलें आणि सॉनेट्च्या चरणांची चवदा ही संख्या तेवढी कायम ठेवून, त्यांच्या विभागांची व यमकांची पद्धति मात्र साफ बदलून टाकली. शेक्स्पीअरच्या मागाहून मिल्टन्नें मात्र सॉनेट्ला पुन्हा त्याच्या अभिजात स्वरूपांत इंग्रजींत दर्शन द्यावयास लावलें. शेक्स्पीअर व मिल्टन् यांच्या व्यक्तिमत्त्वामुळें, त्यानंतरच्या इंग्रजी वाङ्मयांत सॉनेट्ची रचना, या दोन्ही स्वरूपांत होत असल्याचें दिसतें. मिल्टन्च्या मागाहून झालेल्या सुनीतकारांत, वर्ड्स्वर्थ, कीट्स्, मिसेस ब्राउनिंग्, रॉझेटि, थिओडोर वॅट्स् डंटन, रूपर्ट्स् ब्रूक, इत्यादि कवि विशेष महत्त्वाचे असून, त्यांनींही आपापल्या सुनीतांतून, रचनापद्धति व काव्यवस्तु यांबाबत अनेक प्रकारचे वेगवेगळे प्रयोग केलेले आढळतात.

रचनापद्धति आणि काव्यवस्तु, या दोन्ही दृष्टींनीं सॉनेट् हा काव्यप्रकार, इतर काव्यप्रकारांपेक्षां बराच भिन्न आहे. पेट्रार्क्, डांटेच्या कालापासून तों आजपर्यंत, चवदा ही सुनीतांच्या पंक्तींची संख्या, बहुतेक सर्व कवींनीं त्या काव्यप्रकाराचें वैशिष्ट्यदर्शक लक्षण म्हणून, मान्य केलेली दिसते. चवदा पंक्तींचा हा निर्बंध नैसर्गिक नसून सुलतानशाही स्वरूपाचा आहे, असें मानणाऱ्या कांहीं स्वातंत्र्यप्रिय कवींनीं, अधूनमधून तो नियम धुडकावून लावण्याचा प्रयोग केल्याचें, जरी क्वचित् दृष्टोत्पत्तीस येत असलें, तरी त्या बंडखोरीला सातत्याची व वैशिष्ट्यपूर्ण काव्यात्मतेची जोड न मिळाल्यामुळें, तसल्या प्रयत्नांना मान्यता मिळण्याऐवजीं, विक्षिप्तपणाचीं उदाहरणें म्हणून त्यांच्याकडे बोट दाखविण्यासच, टीकालेखकांना त्या कृति अधिक उपयोगी पडत असतात. उलटपक्षीं, सुनीताची चवदा ओळींची ही मर्यादा, एकादें कृत्रिम बंधन नसून सहज व तर्कशुद्ध विकासाची ती परिणति आहे, असें सिद्ध करण्याचा प्रयत्नही कांहीं कट्टर सुनीत–शुद्धिप्रेमी साहित्यपंडितानीं केलेला आढळतो. परंतु या दोन्हीही प्रकारच्या प्रयत्नांत, बहुतेक वेळां सत्यान्वेषणाच्या इच्छेपेक्षां, अट्टाहास व वावदूकपणा यांचाच भाग जास्त दिसून येतो. पक्षाभिनिवेशानें न बारगळतां, या प्रश्नाकडे समजूतदारपणें पाहिलें, तर अशा प्रकारच्या निरर्थक वादांत कांहींच फायदा नाहीं, हें सहज कळून येण्यासारखें आहे. सुनीताच्या चवदा पंक्ति असाव्यात, या प्रथेला शतकानुशतकाच्या परंपरेची मान्यता मिळालेली असून, आजतागायत प्रसिद्ध असलेलीं सर्व सुंदर सुनीतें, या मर्यादेच्या बंधनांत लिहिलेलीं आढळत असल्यामुळें, प्रत्यक्षानुमेय पद्धतीनें, “ चवदा ओळींचें काव्य–विशेष तें सुनीत ” व “ सुनीत म्हणजे चवदा ओळींचा एक काव्यप्रकार;” या समजुतीचें सत्यत्त्व तर्कवादापलीकडचें आहे, असें समजणें भाग आहे.

असाच कांहींसा प्रकार सुनीतांतील विशिष्ट प्रकारच्या यमकरचनेच्या, आणि त्याच्या चौदा ओळींतील अंतर्गत विभागांच्या बाबतींत आहे. पेट्रार्क् व डांटे यांनीं विकसित केलेलें सनातन सुनीत, आठ ओळींचा एक, व सहा ओळींचा दुसरा, अशा दोन भागांत विभागलेलें असतें. सुनीतांतील विषयाचा उपक्रम व त्याची मांडणी, सुनीताच्या आठ ओळींच्या पहिल्या विभागांत करून, सहा

ओळींच्या त्याच्या दुसऱ्या विभागांत, विषयाचा विकास आणि पर्यवसान साधण्यांत येतें. सुनीताची घडण अशा रीतीनें दोन विभागांत होत असली, तरी विषयाचें एकत्व कायम ठेवून, सुनीताचें स्वरूप सलग आणि अखंड राखणें अवश्य आहे, असा सुनीत लेखन-तंत्रज्ञांचा कटाक्ष असतो. सुनीताला नियमभूत बनलेली विशिष्ट प्रकारची यमकरचना, ही ही सुनीताची अखंडितता कायम राखण्याचें महत्त्वाचें साधन आहे. पंक्तीच्या किंवा सयमक पंक्तियुग्मकाच्या शेवटीं, वर्ण्य कल्पना अगर वाक्य पर्यवसित झाल्यास, रचनेचा ओघ प्रवाहित न राहातां खंडित होईल, म्हणून त्या ठिकाणीं विराम येईल अशा प्रकारची वाक्यरचना करणें, हा सुनीत-रचनेच्या शुद्धतेच्या दृष्टीनें दोष गणला जात असतो. सुसंघटितता आणि एकजिनसीपणा, हीं सुनीताचीं प्रधान अंगें असल्यामुळें, पहिल्या भागांतील आठव्या पंक्तीच्या अंतींही, चालू कल्पना व चालू वाक्य हीं पूर्ण न होतां, तीं तशीच नवव्या पंक्तीच्या मध्यापर्यंत चालू राहावींत, अशी खबरदारी सुनीताचें एकत्व कायम राखण्यासाठीं घेण्यांत येत असते. अशा रीतीनें, सुनीतांतील मागचा चरण पुढच्या चरणाशीं, आणि त्याचा पहिला भाग दुसऱ्या भागाशीं साखळींतील दुव्याप्रमाणें जोडला गेलेला असतो. या दामरचनेंत कंटाळवाणेपणा व दूरान्वितता उत्पन्न न व्हावी, म्हणून मधून मधून ध्वनिसादृश्य निर्माण करण्यासाठीं, विशिष्ट पद्धतीच्या यमकांचे टप्पे निर्माण केले गेले आहेत; व त्यांच्या साह्यानेंच अनुसंधान सातत्य, अविच्छिन्न राखून रसपरिपोषांत तुटकपणा न येऊं देण्याची सोय साधतां येते. पेट्रार्क् व डांटे यांच्या सुनीतांचें स्वरूप, अशा रीतीनें, एकाद्या छोट्याशा पण प्रमाणबद्ध रचनेच्या सुंदर आणि स्वयंपूर्ण कलामंदिरासारखें असल्यामुळें, एक विशेष व स्वतंत्र काव्यप्रकार या नात्यानें काव्यक्षेत्रांत स्वतःचें असें खास स्थान मिळविण्यास तें सर्वस्वीं पात्र आहे; आणि यामुळेंच, इंग्लंडमध्यें त्याचें स्वरूप बदलण्याचे अनेक प्रयोग होऊनही, त्याच्या मूळ स्वरूपांतील त्याचें अस्तित्व नामशेष होऊं शकलें नाहीं, हें उघड आहे.

पेट्रार्कन् सॉनेटचें स्वरूप याप्रमाणें पूर्णपणें निर्दोष असतांही, शेक्स्पीअरच्या महनीय व्यक्तिमत्त्वामुळें, त्यानें सुरू केलेली सुनीतलेखनाची प्रथा मात्र इंग्लंडमध्यें

इटालिअन सुनीताच्या बरोबरीनेंच दृढमूल होत राहिली. या प्रकारच्या सॉनेट्मध्यें, अष्टपदी व षट्पदी असे दोन विभाग दिसण्याऐवजीं, चार चार चरणांचे तीन श्लोक व शेवटीं अर्थांतरन्यासात्मक चरणयुग्मक, अशी विभागणी आढळून येते. काव्यवस्तूचें एकत्व, हा दोन्ही सुनीतप्रकारांत साधारण घटक आहे. मात्र शेक्स्पेरीअन पद्धतीचें सुनीत, पेट्रार्कन् पद्धतीच्या सुनीताइतकें सुसंघटित असत नाहीं; व शेक्स्पीअरनें पेट्रार्क्ची यमकपद्धतीही आपल्या सुनीतांमधून अंगिकारलेली आढळत नाहीं. रचनेच्या दृष्टीनें पेट्रार्कन् पद्धतीच्या सुनीतलेखनांत ज्या गोष्टी निषिद्ध गणल्या आहेत, त्या तशा मानण्याचे निर्बंध न पाळतां, शेक्स्पीअरनें आपलीं सॉनेट्स् लिहिलीं; व त्याच्या अलौकिक काव्यात्मतेमुळें, सर्व तांत्रिक बंधनें शिथिल करूनही तो रसाळ सुनीतें लिहूं शकला हें खरें, पण रचनासौष्ठवाच्या दृष्टीनें, त्याचीं सुनीतें पेट्रार्क् किंवा डांटे यांच्या सुनीतांची बरोबरी करूं शकत नाहींत, असें तज्ज्ञाचें मत असल्याचें आढळून येतें.

सुनीत हा काव्यप्रकार आकारानें लहान असला, तरी आशयानें महान् राहिल्यामुळेंच त्याचें काव्यक्षेत्रांतील स्वतंत्र अस्तित्व न्याय्य आणि समर्थनीय ठरलें आहे. सुनीताला विषय कोणता असावा, याबद्दल कांहींच विधिनिषेध नाहीं; पण घेतलेल्या विषयाचा आविष्कार भव्य व उदात्त असा परिणाम निर्माण करण्याला पोषक झाला पाहिजे असा दंडक असून, सखोल विचार किंवा उत्कट व उदात्त भावना जीमध्यें प्रकर्षानें उत्कर्ष पावलेली नाहीं, अशी तंत्रदृष्ट्या निर्दोष असलेली चतुर्दशचरणी रचना, केवळ त्याच कारणामुळें, सुनीत पदवीला पात्र होत नाहीं असा संकेत आहे.

" The Sonnet is a trunk and you must pack,
With care, to ship frail baggage far away;
The 'Octet' is the trunk;'Sestet', the tray
Tight but not over-loaded, is the knack

हें सॉनेट्च्या स्वरूपाचें वर्णन जितकें विनोदी तितकेंच त्याची यथार्थ कल्पना देणारें आहे.

सॉनेट्मधील भिन्नभिन्न भागांचें परस्परानुसंधान व तदंतर्गत विषय–परिपोषाच्या पायऱ्या, यांबद्दल जीं अनेक मतें प्रचलित आहेत, त्यांपैकीं थिओडोर वॅट्स् डंट्न् याचें, सुनीताच्या अंतरंगाचें समुद्राच्या लटेशीं साधर्म्य प्रस्थापित करणारें मत विशेष चिंतनीय आहे.

"A sonnet is a wave melody:
From heaving waters of the impassioned soul.
A billow of tidal music one and whole
Flows, in the 'Octave'; then returning free.
Its ebbing surges in the 'Sestet' roll.
Back to the deep of life's tumultuous Sea."

वॅट्स् डंट्न्चें हें मत, त्यांतील दृष्टांतसौंदर्यामुळें आपाततः जरी नावीन्यपूर्ण व यथार्थ वाटलें, तरी वास्तविक पाहातां, सागरोर्मि व सुनीत यांमधील त्यानें दर्शविलेलें साम्य, केवळ आभासात्मक अर्धसत्य आहे, असें आढळून येईल. लटेच्या वाढत्या जोमाप्रमाणें, सुनीताचें अंतरंग त्याच्या अष्टपदींत विकसित होत असतें हें खरें असलें, तरी किनाऱ्यावर फुटून परत फिरणाऱ्या लाटेप्रमाणें, षट्पदींत तें कमजोर होत जाऊन विराम पावतें, असा जो ध्वनि त्याच्या दृष्टांतांतून निघतो, तो वस्तुस्थितीशीं विसंगत आहे. सुनीताच्या अष्टपदींत भावना किंवा विचार यांच्या विकासाच्या उत्कटतेची जी पायरी गांठली गेली असेल ती षट्पदींत खालीं उतरल्यास, रसापकर्ष होऊन, सुनीताची परिणामकारकता नष्ट झाल्यावांचून राहाणें असंभवनीय आहे. यामुळें वॅट्स् डंट्न्नें षट्पदी व परत फिरणारी लाट, यांवर जें साम्य आरोपिलें आहे, तें पूर्णपणें आभासात्मक व अयथार्थ आहे. सुनीतांतील वस्तुविकासाचें वर्णन दृष्टांतानेंच करावयाचें झाल्यास, चंडोलपक्षाची गगनस्पर्शी भरारी व तीनंतरचें त्याचें आकाशांत तळपत राहणें, यांच्याशीं सुनीतांतील अष्टपदी आणि षट्पदी याचें साधर्म्य दाखवून करतां येईल.

एवंगुणविशिष्ट इंग्रजी सॉनेट्चा मराठी कवितेंतील अवतार, आधुनिक मराठी कवितेचे प्रणेते केशवसुत यांनीं प्रथम घडवून आणला, आणि त्यांच्या इतर

समकालीनांनींही त्यांची साथ करून या नवीन उपक्रमाला पुष्टि दिली. तेव्हांपासून सुरू झालेली सुनीतलेखनाची प्रणाली आजतागायत अव्याहत चालू आहे. आरंभीं आरंभीं, आधुनिक कवींच्या तऱ्हेवाईक हौसेचा आणि अनुकरणाच्या लहरीचा, एक नवीन मासला म्हणून, टीकाकारांनीं या उपक्रमाची हेटाळणी आणि उपेक्षा केली; परंतु कविवृंदामधील या काव्यप्रकाराच्या वाढत्या आवडीमुळें, कालांतरानें काव्यसमीक्षकांनाही त्याकडे गंभीरपणें लक्ष देणें, आवश्यक झालें. सन १९२२–२३ सालीं, या काव्यप्रकाराच्या स्वरूपाबद्दल आणि मराठी काव्यक्षेत्रांतील त्याच्या अस्तित्वाच्या इष्टानिष्टतेबद्दल, बरीच साधकबाधक चर्चा करण्यांत आली. श्री. ना. म. भिडे, प्रो. मा. त्रिं. पटवर्धन, श्री. बा. अ. भिडे, प्रो. श्री. नी. चाफेकर, प्रो. श्री. बा. रानडे, यांच्यासारख्या सुप्रसिद्ध साहित्य-पंडितांनीं, या चर्चेत पुढाकार घेतला होता. या काव्यप्रकाराचें सध्या रूढ असलेलें ‘सुनीत’ हें नामाभिधान याच चर्चेतून जन्म पावलें. याच वेळीं, तत्पूर्वी प्रचलित असलेल्या, ‘चतुर्दशक’ या पंक्तिनिदर्शक लक्षण–संज्ञेऐवजीं, प्रो. श्री. नी. चाफेकर यांनीं, ‘स्वनित’ असा धात्वर्थक प्रतिशब्द वापरण्यास प्रारंभ केला होता, पण तो रूढ होऊं शकला नाहीं. ‘सुनीत’ या नामकरणाचें श्रेय, प्रो. मा. त्रिं. पटवर्धन व द. ल. गोखले यांना आहे; असें प्रो. श्री. बा. रानडे यांनीं “काव्यविचारां”तील आपल्या “सुनीत” या लेखांत नमूद करून ठेवलें असून, “सॉनेट्” या शब्दाशीं “ध्वनिसाम्य असलेला हा प्रतिशब्द, ‘विशिष्ट वृत्तप्रबंधाच्या कालव्यांतून खेळविलेल्या विचारांकित भावनेची कविता,’ हा अर्थ उत्तम रीतीनें व्यक्त करितो.” असें, आपलें त्या शब्दाच्या यथार्थतेबद्दल पसंती दर्शविणारें मतही व्यक्त केलें आहे. अगदीं अलीकडे, थोडें याच्यापुढें जाऊन, विशिष्ट पद्धतीनें रचलेल्या चवदा ओळींच्या कवितेला ज्याप्रमाणें सुनीत म्हणून संबोधण्यांत येतें, त्याचप्रमाणें तशाच प्रकारच्या सहा किंवा दहा ओळींच्या एकविचारमात्र कवितेला “सुनीतिका” अशी नवी संज्ञा असावी; असें एका टीकाकारानें सुचविल्याचें, कांहीं दिवसांपूर्वी वाचल्याचें स्मरतें. श्री. शुक्ल यांना, आपल्या या पुस्तिकेला “सुनीतिका” हें नांव देतांना, वरील अर्थ अभिप्रेत नाहीं, हें अर्थात् उघड आहे. अनेक सुनीतांनीं

सुसज्जित असलेली पुस्तिका, ती "सुनीतिका" असा त्यांचा आशय असला पाहिजे, हें वेगळें सांगावयास नकोच. 'सुनीतिका' या शब्दाच्या निर्मितीच्या अगदीं अलीकडच्या या प्रकरणावरून सुनीतविषयक चर्चेबद्दल अजूनही पूर्ण औदासीन्य निर्माण झालेलें नाहीं हें स्पष्ट असून, आतांपर्यंत मराठींत निर्माण झालेल्या सुनीतांची संख्या व त्या काव्यप्रकारावर झालेल्या तात्विक चर्चेचा एकंदर निष्कर्ष लक्षांत घेतां, सुनीत हा काव्यप्रकार, पर-वाङ्मयांतून आलेला असला तरी, मराठी वाङ्मयक्षेत्रांतील त्याचा निवासाधिकार आतां विवाद्य राहिलेला नाहीं असें समजण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं.

मात्र या 'पराव्या' पोराला पुत्रीकृत करतांना, मराठी कवितेनें त्याला जशाच्या तसा आपणाळला नसून, त्याला व्रात्यस्तोमविधि करावयाला लावला आहे, हें विसरून चालणार नाहीं. मराठी सुनीत इंग्रजी सॉनेट्प्रमाणें चवदाच ओळींचें असतें, एवढेंच मूलभूत साम्य काय तें त्या दोहोमध्यें बाकी राहिलें आहे. इतर सर्व बाबतींत मराठी सुनीत वास्तविक पाहातां अजून प्रयोगावस्थेंतच असून, त्याचें स्वरूप अद्याप निश्चित व्हावयाचें आहे. सुनीतलेखनासाठीं कोणत्या वृत्ताच्या पंक्ति वापराव्या, त्याची यमकरचनापद्धति कशी असावी, त्याचे विभाग दोन असावे, चार असावे कीं सात असावे, इत्यादि मुद्यांबद्दल 'निश्चित आणि उत्तम' मत व्यक्त करण्याची वेळ अद्याप आलेली नाहीं. प्रत्येक सुनीत-लेखक, आपापली इच्छा, कल्पना व आवडनिवड, यांप्रमाणें वेगवेगळे प्रयोग करीत असलेला आढळतो. विषयविकासाची सुसंघटित एकसूत्रता कायम राखण्यासाठीं, दामपद्धतीनें चरणरचना करून, सुनीताचें अंतरंग प्रवाहित व अखंड राखण्याची सोय इंग्रजीप्रमाणें मराठींत नाहीं, ही एक सुनीताच्या योग्य दिशेनें होणाऱ्या विकासाला, मोठी अडचण आहे. मराठी वृत्तांत चरणान्त यति अनिवार्य असल्यामुळें, वाक्यांतील विराम तेथें न आणतां पुढील चरणांत नेणें, मराठी भाषेच्या स्वभावाच्या दृष्टीनें अशक्यप्राय आहे. यामुळें शुद्ध पेट्रार्कन् पद्धतीचें निर्दोष सुनीत मराठींत सर्रास सुरू होण्याचा फारच थोडा संभव वाटतो. शेक्स्पीरिअन पद्धतीचें सुनीतच मराठी कवितेच्या वळणाला अधिक मानवणारें

असल्यामुळें, त्या प्रकारच्या सुनीताची पैदास मराठींत बरीच होत असलेली दिसते; परंतु अशा सुनीतांच्या अंतरंगांची थोडी छाननी करून पाहिली असतां चवदा ओळींच्या संख्येमुळें बहिरंगानें सुनीतांसारख्या दिसणाऱ्या त्या कवितांमध्यें, सुनीताच्या वास्तविक वैशिष्ट्यांचा अभाव असून, संस्कृत कवितेंत प्रचलित असलेल्या, अन्योक्ति व सुभाषित या स्फुटजातींच्या काव्यांचेंच, तें एक परकी पोषाखांतलें सोंग आहे, असें आढळून येतें. चार चरणांऐवजीं चौदा चरण लिहून वाढीच्या पंक्ति, उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टांत यांनीं भरून काढल्या, किंवा चवथ्या चरणाच्या जागीं अंत्य-युग्मकांत अर्थांतरन्यास करून सुभाषितात्मक सार काढलें, तरी त्याच्या मूळच्या स्वरूपाची ओळख बुझूं शकत नाहीं.

अन्योक्ति व सुभाषित यांच्याप्रमाणेंच सुनीताच्या अंतरंगाशीं व बहिरंगाशीं बरेंचसें साम्य असलेला पण त्यांच्याहून सुनीताशीं अधिक साधर्म्य असलेला, मराठींतील जुना आणि लोकमान्य काव्यप्रकार, अभंग हा होय. लौकिक विषयांवर लिहिलेल्या संतकवींच्या अभंगांची छाननी करून पाहिली असतां, या म्हणण्याचा प्रत्यय पाहावयास सांपडेल. प्रस्ताव, विकास व पर्यवसान अशाच पद्धतीची मांडणी त्या अभंगांतून आढळते; वर्ण्य वस्तूचें एकत्व त्यामध्यें पाहावयाला मिळतें; व अशा प्रकारच्या अभंगांची चरणसंख्याही बहुशः चवदाच्या आसपासच असते. मराठी सुनीत-लेखकांनीं, सुनीतासाठीं प्रामुख्यानें प्रचलित असलेल्या शार्दूलविक्रीडित वृत्ताच्या पंक्तिव्यतिरिक्त इतरही कांहीं वृत्तांच्या व जातींच्या पंक्तीचा उपयोग करून पाहाण्याचे प्रयोग केले असले, तरी अभंग छंदाच्या चरणांचा उपयोग, सुनीतरचनेसाठीं, श्री. शुक्र यांच्या व्यतिरिक्त, क्वचित्‌च कोणी मराठी कवीनें केला असेल. प्रस्तुत संग्रहांतील श्री. शुक्र यांची अभंग छंदांतील सुनीतें, जुन्या कवींच्या स्फुट अभंगांशीं ताडून पाहिलीं असतां, जुन्या मराठी कवींचे अभंग व आधुनिक मराठी कवींचीं सुनीतें, यांचें गोत्र एकच असावें, असा भास होतो. व त्यावरून मराठी सुनीताच्या भावी विकासाला, खास मराठीच्या वळणानें, कोणती नवीन दिशा लागण्याचा संभव आहे, याची कल्पना करतां येते. या दृष्टीनें, प्रस्तुत संग्रहांतील अभंग छंदांत लिहिलेलीं सुनीतें, हें त्याचें प्रामुख्यानें उल्लेख करण्यासारखें एक वैशिष्ट्य आहे.

श्री. शुक्ल यांच्या या संग्रहांतील सुनीतांचें, याठिकाणीं काव्यदृष्ट्या मूल्यमापन करण्याचें प्रयोजन नाहीं; कारण तें काम प्रस्तावनालेखकाचें नसून काव्यपरीक्षकाचें असल्यामुळें तें त्याच्याचसाठीं राखून ठेवणें योग्य होईल. श्री. शुक्ल यांनीं आत्म-प्रकटनासाठीं ज्या काव्यप्रकाराचा अवलंब केला आहे, त्याच्या विकासाचा इतिहास थोडक्यांत देण्याचा व त्याचें स्वरूप विशद करण्याचा अल्प प्रयत्न करणें, हा या प्रस्तावनेचा हेतु असून, विद्वान् टीकाकारांप्रमाणेंच सर्वसामान्य रसिकालाही या संग्रहांतील सुनीतांच्या काव्यात्मक गुणावगुणांबद्दल स्वतःचें मत बनवतां यावें, एवढाच या साऱ्या पसाऱ्याचा उद्देश आहे. स्वाभाविकच संग्रहांतील वेगवेगळीं सुनीतें घेऊन, त्यांचें वर्गीकरण करण्याच्या व त्यांच्या काव्यगुणांची मीमांसा करण्याच्या भरीस न पडतां, तें काम करण्याची सिद्धता रसिकांसाठीं करून ठेवण्यांत आली असून, तिची त्यांना मदत होईल अशी उमेद आहे.

एक एक सुनीत घेऊन त्याच्या काव्यगुणांची विचक्षणा येथें केली नसली, तरी संग्रहांतील एकंदर सर्व कविता वाचल्या असल्यामुळें, उत्कट भावना, साधी, सरळ रेखीव आणि टापटिपीची रचना, नादमधुर असूनही अर्थवाही अशी ललित भाषासरणी, व्याकरणशुद्धता, छंदःशुद्धता, इत्यादि शुक्लांच्या कवितेंत नेहमीं आढळून येणारे महत्वाचे काव्यगुण त्यांच्या या 'सुनीतिकें'तही प्रकर्षानें प्रकट झालेले आढळतात, असें साकल्यानें विधान करण्यास मात्र कांहींच प्रत्यवाय वाटत नाहीं.

पुणें, डेक्कन जिमखाना<br>१७ जुलै १९३७

के. नारायण काळे

# शुक्ल-साहित्य

संगीत नाटकें

सौ भा ग्य ल क्ष्मी
सिंहाचा छावा
स्वर्गावर स्वारी
साध्वी मिराबाई
सा क्षा त्का र
स त्या ग्र ही

काव्यसंग्रह

कुमुद बान्धव
सु नी ति का
सं गी ति का

प्रबन्ध

प्रेमाच्या कानगोष्टी

ललितलेखसंग्रह

भ रा री

× × ×

**संकलिपत**

कथासंग्रह

मधाचें पोळें
बि ल्व प त्र

कादंबऱ्या

कुमारिकेची किंकाळी
जी व न


कुमुदबान्धव

# सुनीतिका

कुमुदबान्धव

स्थळ प्रत
नोंद नं. ९३५८
ता. १२।७।५८

# देवि कविते !

[ वृत्त–मन्दारमाला ]

संसारसन्तापसंहारकर्त्री चिरंसौख्यदात्री महन्मङ्गला
तू प्रेमला काव्यदेवि ! प्रमोदें नमस्कारितों नम्रभावें तुला
तू स्वर्ग, तू मोक्ष, तू सर्व कांहीं, तुझ्यावीण नाहीं दुजा आसरा
सञ्जीवनी शान्तिची जीवनीं दे, प्रसादें करी धन्य या किङ्करा

माझा जरी स्वैर सञ्चार चौफेर या वाङ्मयोद्यानिं कोठें किती
चित्तांत केवी बुझावी तुझी गे स्मृती सौख्यदा ती सदा जागती !
हिण्डे फिरे मूल चोहीकडे दूर खेळे जरी भावडे बागडे
होतां श्रमी जीव वेगें परी तें स्वभावेंच धांवें स्वमातेकडे

कोणी करी तोण्डपूजा, विषारी कुणी विन्धिती तीक्ष्ण निन्दाशरें
कोणी पथीं आंखल्या आड येती वृथा साधिती शत्रुता मत्सरें
उद्वेगलेलें परी चित्त रङ्गें तुझ्या गायनीं, मी तुला विस्मरूं !
निन्दास्तुतीची दुतोण्डी जगाच्या वृथा खन्त या अन्तरीं कां धरूं !

ध्यावें भजावें यथाशक्ति मी भाविवावें नि सन्तोषवावें मना
गावें तुला आळवावें अहोरात्र ही मात्र आतां उरे कामना

५६२८



मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ५६२८

# याचना

घेतली धांव पायीं तार वा मार देवा !
हस्त ठेवी कृपेचा मस्तकीं लाथ दे वा

देइ कोण्डा भुकेला आणि धोण्डा निजाया
खाद्य उञ्ची न वाञ्छी पञ्चपक्वान्न मेवा

द्रव्य गांठी नको रे ती प्रतिष्ठाहि लोकीं
कीर्तिची हांव खोटी ना मनीं दम्भ हेवा

पोटिं जें तेंच ओठीं भाव साधासिधा हा
स्वार्थ माझा न कोणा प्रार्थितो ' लोभ ठेवा '

आक्रमी सन्थ माझा आंखला पन्थ नामी
मी विरागी, कुणाचें तें न लेवा न देवा

आसरा तूं अनाथा तप्त जीवा निवारा
लेकरूं हट्ट घेई, कां तुला ये न केवा !

नित्य लोकस्वरूपें नान्दसी सत्य वाटे
मुक्ति अन्तीं मिळाया ती घडो लोकसेवा

# दैव-लिखित

[ वृत्त-शार्दूलविक्रीडित ]

स्वच्छन्दी फुलपाखरूं मन रमे सेवी सुधामाधुरी
बाल्योद्यानिं मजेंत काळ सरला अर्ध्या तपाचे वरी
शाळेच्या चिमण्या जगांत जनकें विद्यार्जना धाडिलें
प्याया ज्ञानसुधा उतावीळ तदा मच्चित्त आनन्दलें

पन्तोजी गिरवावयास शिकवी दों तीन धूळाक्षरें
'श्री' हातांत न, तों छळी 'ग' कुठला ? भाम्बावलें मन्मन
रेघोट्या अडव्या उभ्या खरडल्या ज्या अर्थ साधाहि न
झाला मात्र अनर्थ योग्य मिळतां शिक्षा मला त्यामुळें

या माझ्याहि अरुन्द भाळपटलीं रेषा उभ्या आडव्या
मौजेनें जणुं अर्थहीन अवघ्या दैवें पहा काढल्या !
खेळोनी स्वमनास कीं रिझविलें ? शिक्षा परन्तु मला
जन्माचा मम खेळ होय ! उलटा हा न्याय हो कोठला ?

लेखाचा तव दिव्य अर्थ नुमजे ठाऊक तूझा तुला
दैवा ! घोर अनर्थ मात्र बघ रे ! माझा तयें जाहला

# विधाता

[ वृत्त-शार्दूलविक्रीडित ]

तेजस्वी अति हीं मनोहर किती ताराफुलें साजरीं
अस्ताव्यस्त उगाच फेंकुनि दिलीं आकाश-माळावरी
हा सौगन्धभरें गुलाब बहरे कीं कण्टकीं कोम्बला
रत्नांचा खजिना अमोल परि तो सिन्धूतळीं डाम्बला

भारी दाहक चञ्चला विलसली प्रीतिप्रभा मोहक !
लोपे द्राक्षरसांत केवि जहरी मद्यार्क उन्मादक !
पेला तो अधरीं जरा न ठरला सौख्यामृताचा नवा
दुक्खाची अनिवार आग छपली जाळीत जाई जिवा

आशेची नव पौर्णिमा उजळली आनन्द-तेजें फुले
येते कृष्ण अमा सवेंच ! मन हें नैराश्यशोकें उले
विश्वाचें करिं सूत्र नाचवित ही मायावती खेळते
हें चाले सुखदुक्खचक्र ! विधिची सत्ता करी खेळ ते

सौन्दर्यें भरल्या जगीं विषमता ही दुक्खदा ओङ्गळ
हा हा हन्त ! न खन्त अन्तरिं दया ! भासे विधाता खळ

५६२८

## मधुर बाला

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

आनन्दी मननन्दिनी विहरते प्रेमामृतस्यन्दिनी
खेळे चन्द्रकला प्रशान्त धवला विश्रब्ध विश्वाङ्गणीं
स्वर्बाला मधु मङ्गला अवतरे स्वर्गासवें भूतलीं
साक्षात् सुन्दरता प्रलोभनपदा किंवा स्वयें पातली

उत्साहप्रद चित्कला सुविमला कीं ही उदेली उषा
प्रेमें मुक्तकरें अखण्ड उधळी आनन्द दाही दिशां
कीं कल्पद्रुम–मुग्ध–चारु–कलिका स्वर्गातुनी ही गळे
कीं मोही सुरसम्पदा दिपवुनी नेत्रांस तेजोबळें

कीं ल्याली सगुण स्वरूप विधिची लीला मनोज्ञा नवी
पुण्यात्मा–सुतपःप्रभा प्रकटली ! पुण्याइची जान्हवी
सत्काव्यप्रतिमाच सुन्दरतमा ही सौख्यसीमा खरी
वर्णाया गुण–रूप उज्वल हिचें हो श्रान्त ही वैखरी

या जन्मीं नच भाग्य लाभत तरी जन्मान्तरीं लाभुं दे
माझी मैत्रिण वा दयाळु भगिनी देवा ! हिला होउं दे

९१६

# काळी चन्द्रकळा

[ जाति–चन्द्रकला ]

झोकें घेत कुणी बालिका झोपाळ्यावरती
ओंवी गुणगुणली ‘ काळि ग चन्द्रकळा ’ ऐशी
ऐकुनि कानीं ती सहज तो प्रश्न उठे चित्तीं
चन्द्रकला धवला परी जन वदती कृष्ण कशी ?

व्यर्थ इन्दुची ती मन्दमति निन्दा चालविती
सान थोर घेती तोण्डसुख, खन्त न हृदया ती
अन्ध दृष्टिला कीं जगाच्या मुळींच ना दिसतें
शान्त शुभ्र कान्ती शशिकला दिगन्ति उधळी तें

चरित महात्म्यांचें जगीं उज्वल आदर्शच तें
निन्दाप्रिय जगता ! तुला परि मलीन कां दिसतें ?
धिग् बालिशता ! धिक् पिशुनता ! निन्दिसि थोरांना
भलें झुगारोनी हीन तें झेलिसि माथां नां ?

विषाद नच मानी मनीं तू चन्द्रकले बाई !
सज्जन – निन्देची आमुची रुची नवी कां ही ?

# प्रभुमूर्ति ललना

[ वृत्त—तोटक ]

सखये ! सजलों तुझिया स्तवना
स्तुति मानिसि मात्र अवास्तव नां ?
सुमनें फुलतात कुणास्तव ना
परि देति सुगन्ध समस्त वना

गुणकान्ति तुझी विमला अतुला
परि आकळणार तुझी न तुला
तव सद्‌गुण सुन्दर चुम्बकसे
मन हर्षित कर्षित होते कसें !

अबला स्तुतिला वश होति परी
अपवादच तू नियमासि खरी
स्तुतिला परमेशहि भाळुनियाँ
निज भक्तजनांवर दावि दया

बुध सार्थच ते म्हणुनी वदती
प्रभुमूर्ति असे ललना जगतीं !

# लीला-लाघव

[ वृत्त-पृथ्वी ]

झुले चटक चान्दणी चमचमा नभःप्राङ्गणीं
खुले कनककोन्दणीं हिरकणी प्रभेची खनी
फुले कळिच कोंवळी मधुर गन्धशोभायुत
डुले, करित सर्वदा रुचिर हास्य सुस्वागत !
बनांत बिजली लवे करि नवे लपण्डाव ते
हंसे गगनिं चन्द्रकोर नव, चित्त हेलावतें

तुला बघुनि कल्पना उसळतात लीले ! किती
तुवांच रसवन्तिला बहर आणिला सम्प्रती
अशा नयनतारका हंसत आपुल्या रोंखुनी
कशासि बघतेस आडुनि हळूंच डोकावुनी ?
तुझ्या नवल पाहुनी सहजरम्य लीला अशा
क्षणांत बनती पहा रसिक वृत्ति वेड्यापिशा !

प्रसन्न मन जाहलें, विसरलों मनस्तापना
प्रभूच निज लाघव प्रकटवी गमे मन्मना

## प्रेमाचा प्रभाव

[ वृत्त-शार्दूलविक्रीडित ]

मानी तापट वृत्तिचा बहु असे मी स्वावलम्बी पुरा
ध्येयामागुन धांवलों त्यजुनियां आप्तेष्ट देशान्तरा
आपत्ती किति साहिल्या, करपलें काळीज दुक्खानलीं
कोणी नाहिं सहानुभूति लवही तेंव्हां मला दाविली
दैन्याच्या वणव्यांत होरपळलों त्याची न चित्ता क्षिती
त्वत्प्रेमामृत लाभलें मज, नवी जादूच मीनाक्षि ! ती

आतां आज परी नवे सुदिन हे दैवें मला दाविलें
भाग्यश्री उजळेच पूर्वसुकृतें जें वाञ्छिलें तें मिळे
संसारीं सुखसाधनें पसरलीं माझ्या सभोतीं जरी
आनन्दी न हताश खिन्न मन हें संन्यासवृत्ती वरी
नित्याचा क्रम चालला मम अतां जीवन्मृतासारखा
याला कारण एक ! होत तुझिया प्रेमास मी पारखा

स्वर्गीय द्युतिनें स्मशान फुलतें प्रीती मिळाली तर
स्वर्गाचेंहि बने स्मशान अवघें प्रीती निमाली तर

# वाञ्छा एक !

[ वृत्त-शार्दूलविक्रीडित ]

रस्त्यानें रडक्या जगीं रखडतां दृष्टी तुवां वेधिली
आशेची नव तारकाच हंसली, ग्वाही मनानें दिली
जागे जीव पिसाट, घोर भंवतीं नाचे निराशातम
तारे ! तू हंसतां परन्तु उजळे हृत्प्रान्त सारा मम

झालें ओझरतेंच दर्शन ! मना ही ओढणी लागुनी
वेडा जीव झुरे उगाच हळवा, जाई तुझ्या मागुनी
मी हा पामर रङ्क ! आणि तुजला तें स्वर्गसिंहासन
स्वर्लावण्य परन्तु वेड जगतीं लावील कोणास न ?

काव्यीं चित्र चितारलें नच रुचे माझें मला हें परी
व्हावें चित्र गमे निरन्तर तुझ्या तेजाळ नेत्रान्तरीं
तेजस्वी उमले चिरन्तन फुले ती स्वप्नसृष्टी नवी
आशावीचि अनन्त नाचवि मनीं सत्प्रीतिची जान्हवी

बैसे लावुनि शून्य दृष्टि गगनीं मी हा खुळा काजवा
वाञ्छा एक ! चिरंप्रकाश मज तू दे गे ! स्वतेजें नवा

सं. काव्य नं. ११... ता. १५/७/५८

## प्रशंसा !

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

बाला काव्य–कला–विलास–चतुरा तू प्रेमला निर्मला
प्रेमानें तुझिया असें शिकविलें काव्यें रचाया मला
नाचे भ्रू–धनु रम्य, हृद्गत वदे दृष्टी तुझी चञ्चल
चाले जीवनगान हें मम गडे ! त्या एकतालावर

देहीं जीवकळा तुझ्याच विमल प्रेमामुळें खेळतें
हातीं जोंवर लेखणी हलविण्या सामर्थ्य हें नाचतें
गाणीं गाइन मी यथामति नवीं नानापरी सुन्दर
लाभे प्रीतिसुधा तुझी मज सदा स्फूर्तिप्रदा मङ्गल

गाती मद्गुण आदरें रसिक हे, सन्मानिती, वानिती
हंसक्षीरनयें उदार हृदयें काव्यास या सेविती
तूंही कां म्हणुनी वृथा मम अशी गासी प्रशंसा मुखें
होतां एकच तू नि मी, वद कुठें द्वैतास थारा सखे !

वाटे तू करिशी प्रशंसुनि मला आत्म–प्रशंसा गडे !
सुज्ञाला करणें कदापि वद कां आत्मस्तुती आवडे ?

नोंद नं. ५६५६

# तो काळ धन्वन्तरी !

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

[ एका प्रेमवेड्याचे उद्गार ]

' कां हा वेष मलीन दीन ? हंसरी वृत्ती विनोदी कुठें ?
बेपर्वाइ भणङ्ग वृत्तित दिसे दिल्रङ्ग कां पालटे ?
कां हो खिन्न विरक्त नित्य दिसतां ? व्याधी कशाची जडे ?
कां एकान्त रुचे ? किमर्थ बदले ही चालचर्या अशी ? '

ऐसे व्यर्थ सवाल कैंवि करतां ? माझी कथा जाणतां
लागे वेड तुम्हांस हेंच मजला वाटे अतां तत्त्वतां
' ती ' माझ्या असहाय हाय ! हृदया गेली करोनी व्रण
माझें दुक्ख मलाच माहित पुरें ! बोलूं कशाला पण ?

वृद्धांनों ! उपदेश रुक्ष तुमचें पाण्डित्य सारें लुळें !
तुम्हीही भर यौवनांत असले केलेत नां चोंचले ?
मित्रांनों ! उपहांसुनी हिणविणें शोभे मुळीं ना तुम्हां
बोला ईश्वर–साक्ष सत्य ! नच कां तुम्हांसही रोग हा ?

कोठें औषध रामबाण ? पुसतों मी प्रेमवेडा तरी
प्रीतीरोगनिवारणार्थ जगतीं तो काळ धन्वन्तरी !

# नको मुरली वाजवूं

[ गज्जल–'अगोट' ]

अखण्ड एकच कां हा सुचे तुला चाळा ?
नसे तुझ्या मुरलीवादना कसा आळा ?

व्रजाङ्गना घरकामास देउनी टाळा
खुळ्यावल्या जमल्या, नाहिं लाज कण्टाळा

कशा पिशापरि धेनू त्यजोनि गोशाळा
निनादतां मुरली धांव घेति स्नेहाळा !

अवेळ वेळ मुळीं पाहसी न गोपाळा !
विशुद्ध बुद्धि बने भ्रान्त लोल हिन्दोळा

विटून गोकुळ गेलें असह्य जञ्जाळा
परन्तु शासिल रे कोण देवकीबाळा ?

खट्याळ ही मुरली, कां उगाच निर्वाळा ?
अनर्थ माण्डिसि बाह्यान्तरांत तू काळा

नको नको मुरली वाजवूं तिन्ही काळा
तुझी सखी विनवी राधिकाच वेल्हाळा !

# अर्पितों सर्वस्व तूतें

[ गजल—पाण्डव ]

कांहिं ना माझें जगीं या  सर्व जें तूझेंच तें
द्यावया तूझें तुला तें  काय माझें वेंचतें ?

वर्णवेना  अन्तरींची  गूढ ती संवेदना
जी बळें तुझ्याकडे गे !  मन्मनाला खेंचते

पाच मोलाची कुठें तू !  कांच मी सामान्य गे !
पात्र ना त्वत्प्रीतिला हें  शल्य जीवा जाचतें

काव्यमूर्ति स्फूर्ति माझ्या  लेखनाची तू गडे !
कीर्तिचें सारें म्हणोनी  श्रेय तूझें साच तें

शाश्वतीची दिव्य तूझी  सद्गुणांची सम्पदा
वैभवें भङ्गूर माझी !  लाज चित्तीं डाचते

चित्त माझें मालकीचें  स्वामिनी त्याचीहि तू—
तूझिया नेत्रीं सखे ! तें  भाग्यलेखा वाचतें

अर्पितों सर्वस्व तूतें  सर्वथा कङ्गाल मी
लोपला मी—तू—पणा  साङ्गूं कितीदां तेंच तें ?

# तें तुझ्या स्वाधीनचें

[ गज्जल–पाण्डव ]

नाचती ओठावरी हे बोल वेड्या प्रीतिचे
ऐकुनी घेणें न घेणें तें तुझ्या स्वाधीनचें

हें जिणें जीवन्मृताचें कण्ठितों मी रोजचें
मानणें ना मानणें वा तें तुझ्या स्वाधीनचें

प्रेम माझें कां, कसें हें मी किती वर्णायचें ?
दोष कीं सन्तोष देणें तें तुझ्या स्वाधीनचें

गुङ्गलेल्या या जिवाला प्रीतिचें गाणें रुचे
साथ देणें कीं न देणें तें तुझ्या स्वाधीनचें

प्राणपुष्पांचाच झेला मी तुझ्या हातीं दिला
झेलणें लाथाडणें वा तें तुझ्या स्वाधीनचें

प्रेम जीवापाड माझें हें जडे तूझ्यावरी
प्रेम तू दावी, न दावी तें तुझ्या स्वाधीनचें

स्वर्ग पृथ्वीचा बनावा फत्तराचा देव तो
आस ही माझी परन्तू तें तुझ्या स्वाधीनचें

# सङ्कोच हा कशाचा ?

[ गज़ल—आनन्दकन्द ]

प्राजक्त मोगरींचा झेला कळ्याफुलांचा
गेला सुकून तूझ्या बोलें फुलावयाचा

कानीं मनीं घुमे ती बोली तुझी श्रवोनी
मञ्जूळ दिल्‌रुबाही भासे कठोर साचा

एकेक बोल साचा पेला सुधारसाचा
छे ! वाग्विलास तूझा त्याहूनि माधुरीचा

लोळे तुझ्याच ओंठीं आशा सुखासुखाची
ठेवा तुझ्याच हातीं मद्‌भाग्यवैभवाचा

बेचैन जीव, राही ना धीर हा जराही
तो खेद भेद कांहीं नाहीं भल्याबुऱ्याचा

कां प्रेमनाश झाला ? कां व्यर्थ हा अबोला ?
झाला गुन्हा कळूं दे तो काय एकदांचा

' मी बोलणार नाहीं ' हें एवढें तरी गे !
तू बोल, खोल वाचा, सङ्कोच हा कशाचा ?

# प्रीतिच्या प्रान्तांत

[ वृत्त–वारुणी ]

प्रीतिच्या प्रान्तांत साचें राज्य नान्दे तें मुक्यांचें
शब्दसृष्टीला विनाशी कीं जिणें लाधे धुक्याचें

शब्दसामर्थ्यासि येई पङ्गुता निर्जीवताही
जीवभावाचे न होती स्पष्ट सारे बोल वाचें

दिव्यता स्नेहाळ नेत्रीं भावनाभाण्डार साजे
प्रीत जुल्मी दे इशारा जीव बन्दा दास नाचे

एकमेकां साङ्गती हे गूज डोळे अन्तरींचें
दोन जीवांचें लपेना गूढ तें सम्भाषणाचें

भावना येतां भराला ठाव ना शब्दांसि तेथें
बोलती निःशब्द भाषा ते उमाळे अन्तरींचें

वावरे सङ्कोच भीती बावरे जिव्हा बिचारी
नेत्रबोली अग्रणी कीं सोडवी कोडें जिवाचें

प्रीतिला वाचा फुटोनी अङ्ग प्रत्यङ्गांतुनी
चोरटे चाळे सुखाचे त्या अनङ्गाचे सदाचे

# कोकिळास

[ गझल–माधव ]

देवाजिचा कृपा–वर हा थोर आगळा
बारीक उन्च सुस्वर लाभे तुला गळा

दैवीच देणगी तव कर्तृत्व काय तें ?
तू वाहसी अवास्तव कां गर्व कोकिळा ?

ना रूप रङ्ग सोज्वळ नाहींस सद्गुणी
बाह्यान्तरांत केवळ काळी तुझी कळा

ना मौज रङ्गही नव दूजी तऱ्हा जरा
गाणें कुहू कुहू तव दे ना विरङ्गुळा

सद्भाग्य तें शिकन्दर तूझें जगीं, परी
कां राजहंस सुन्दर होईल कावळा ?

कोणी रसाळ पण्डित गाती तुझ्या यशा
वेडावले अखण्डित ! मी तो नव्हे खुळा

आजन्म तू परभृत कर्तृत्वशील ना
वानी न सुज्ञ केवळ दैवाचिया बळा

# भ्रम-निरास

[ वृत्त-शार्दूलविक्रीडित ]

जादूगार जगास हा झुलवितो प्रेमाच कां एकला ?
प्रेमावीण अशक्य जीवन जगीं, ही सत्य कव्युक्ति कां ?
मायाजाल असा असार पसरे सारा पसारा फुका
कीं संसारच सौख्यसार ? जगतीं हा स्वर्गसा ठाकला ?

केंवी तो भुवनीं प्रभु प्रकटुनी दावी स्वरूपें नवीं ?
कैसी त्यास कधीं कुठें बघुं शके आशा खुळी मानवी ?
आहे धन्य जगीं मनोज्ञ ललनाजाति प्रभावी गुणी
सौन्दर्यें जिचिया गुलाम बनले राजे तपस्वी मुनी ?

पावे वैभव मात्र ईशपदवी लाधे जगीं थोरवी
कांहीं श्रेष्ठ जगीं धनाविण दुजें जीवास जें लोभवी ?
एकाकी उठली अशीच भलती प्रश्नावली मन्मनीं
चाले तर्कवितर्क ! बुद्धिहत मी ! कोडें सुटेना क्षणीं ?

येतां फेंकित दृष्टि उज्वल अशी स्नेहार्द्र तू प्रेमले !
चित्तभ्रान्ति पळे सदुत्तर मिळे नेत्रीं तुझ्या मङ्गले !

# दे भरोनी प्रीति-पेला

[ गज़ल—पाण्डव ]

पाजले पेले विषारी क्रूर दैवानें मला
जाळती जाणीव झाली अन्त आतां नेमला

दम्भ शिष्टाचार माजे सोङ्ग साजे सोवळें
ना जगीं लाभे जिव्हाळा चित्त पोळे कोवळें

क्रूर सत्यांची निशाणी जागजागीं थाटली
दीर्घसूत्री ही निराशा— रात्र चित्तीं दाटली

स्वार्थवृत्तीची प्रचीती पूर्ण आली ही भली
गोड शब्दांची सुखाशा तीहि नाहीं लाभली

वीट आला या जगाचा पाश आतां तोडला
तीर या वाऱ्यागती हा बेनिशाणी सोडला

दे भरोनी प्रीतिपेला ! ऊठ ! कांठोकांठ हा
राजसे ! चाळे पुरे गे ! दाह जीवाचा पहा !

भारुं दे इश्की नशा जीवा समाधी लागुनी
अन्तरींची ही सदाची विस्मरूं दे कांचणी !

स्थल प्रत
काव्य नं. ११८८८
ता. १२/१/३८



# उत्कण्ठा

[ जाति—स्वर्गङ्गा ]

भरला दरिया तुफान तुम्बळ खवळे हृदयाचा भारी
उत्कण्ठेच्या उन्चावोनी उर्मी उसळति वरी वरी

सळसळ वरती फेसाळोनी पूर वाहतो प्रेमाचा
गडे ! भावभाण्डारच उघडें ! प्रकाश आशारत्नांचा

निरखुनि सुन्दर तव वदनाचा चन्द्र उजळत्या कान्तीचा
भरती ये आनन्दसिन्धुला हंसला तारा जीवाचा

गाढ मिठी घालुनी जिवांची ये सखये ! स्नेहाळ मनें
परस्परांच्या हृदयसागरीं उडी घेउं या प्रेमानें

प्रणयतरङ्गासङ्गें रङ्गुनि अन्तरङ्ग मग उभयांचा
अनन्तांत गे जाइल विरुनी पाश तोडुनी द्वैताचा

अव्यक्ताचा अज्ञेयाचा अन्त शोधुं सुन्दरी ! तरी
दिव्य सुखाच्या कल्लोळामधिं झुलेल मन हें घडीभरी

शून्याच्या परतीरावर चल अद्वैताच्या मैदानीं
जीवनसर्वस्वाचीं गाऊं दिव्य प्रीतीचीं गाणीं

# तें चुम्बन

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

एकान्तीं मज देखुनी अवचिता मद्भाव तू जाणुनी
लाजें सावरलास गे पदर तो दूरी उभी राहुनी
झाला हर्ष मनीं भयें परि वृथा देहीं भरे कांपरें
बोंचे वीण–सुई करांतुन गळे कीं भान कांहीं नुरे

दृष्टी बावरली वळे झट तुझी खालीं बघे चोरुन
येतां मी जवळी उगाच भिवुनी गेलीस भाम्बावुन
घालोनी तव कण्ठि हात उजवा सोत्कण्ठ आलिङ्गनीं
चिन्चोळी हनु ती वरी उचलली मी चुम्बना लोभुनी

मानेचा मुरडोनि झोंक कलता किञ्चित् तदा राजसे !
शृङ्गारें वदलीस, ‘ काय तरि हो हें इश्श बाई असें ! ’
चुम्बाया फिरुनी प्रयत्न करतां ओठीं हंसें दाबुनी
कांहीं तू वदणार तोंच पळसी चाहूल ती ऐकुनी

प्रेमाच्या पहिल्या क्षणीं जिकिर तू केली अशी ज्यास्तव
दे ! दे ! तें पहिलेंच चुम्बन गडे ! ना धीर चित्तीं लव

[ वृत्त—वारुणी ]

# हांसऱ्या नेत्रांत

हांसऱ्या नेत्रांत भासे तेज जादूचें झळाळे
पाहसी कां रोखुनीयां हे तुझे मिश्कील डोळे ?

वर्षिती धारा सुधेच्या अन्तरङ्गींचे उमाळे
साङ्गते हीं गूजगोष्टी चन्द्रिका दृष्टींत खेळे

आपुली होतां अकस्मात् भेट एकान्तीं चुकोनी
प्रीतिगङ्गा पूर लोटे भावना चित्तीं खळाळे

एरव्हीं सङ्कोच भारी दाविसी आतां धिटाई
जीविंचा तूझा जिव्हाळा शब्दरूपें कां उफाळे ?

आडतो ओठीं परी तो शब्द ये जिव्हेवरी जो
धीर बोलाया न होतो तू नको बोलूंच बाळे !

अन्तरींचा भाव रङ्गे लाजऱ्या नेत्रीं तरङ्गे
नाचतो प्रेमाश्रुसङ्गें, कां निराळे प्रीतचाळे ?

चार नेत्रांचीं मुक्यांचीं चालतां सम्भाषणें हीं
लाडके ! जीवासभोंतीं टाकिलें तू मोहजाळें

# चार अक्षरें

[ जाति–चन्द्रकला ]

चार अक्षरें तीं जादुचीं तुझिया नांवाचीं
कानीं मनिं घुमती सदाची जीवाभावाचीं

जीव–जिभेनें या चालला नित्य पाठ जप हा
गोड नशा चढती अनावर मनास होत पहा !

कण्ठित विरह-निशा मोजितां तारे आकाशीं
नामाक्षरतुलना करी मन शुभ नक्षत्रांशीं

लेखनसामुग्री आणितां नवीन कांहि कधीं
पारखून बघण्या लिहितसें नांव तुझें आधीं

सञ्जीवनदाता मन्त्र तो चतुराक्षरी गमतो
सुमधुर नाम तुझें जीव तत्पारायणिं रमतो

श्रवणीं वाचनिं ये कधिं कुठें–त्या जरि अन्य धनी–
नांव तुझें म्हणुनी ठाकते तुझीच मूर्ति मनीं

चार अक्षरें तीं इष्ट ना लिहिणें स्पष्टपणें
चार अक्षरें हीं अशीं तरि लिहिलीं प्रेमानें

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

## कां शङ्का ?

सौंदर्यें भंवतीं किती विनटलीं साकार ही पाहुनी
नित्याचीच जडे जिवा संवय कीं जावेंच वेडावुनी
जादूची नव दिव्य जेथ विधिची सौन्दर्यसृष्टी हंसे
तेथें दृष्टि वळे, बळें रसिकता ओढी मला राजसे !

आनन्दें फुलली भरें बहरली लावण्यपद्मावली
ओसण्डे नव सुस्वरूपरस तो ! चिद्वृत्ति भाम्बावली !
तेथें हे मम नेत्रभृङ्ग वळतीं प्रेमें मुदें रङ्गती
चित्तीं नाहिं मलीन हेतु लवही, निष्पाप भोळे किती !

जें जें मोहक अन् अलौकिक जगीं तें सर्व मोही मना
डोले जीव, पवित्र जागृत तदा हाले मनोभावना
स्फूर्तीनें मग हीं अशीं रचितसें काव्यें मनोरञ्जना
या योगें मम चित्तभाव चळला ही कां खुळी कल्पना ?

माझे नेत्र कसे कुठेहि फिरले सौन्दर्यलोभी जरी
जीवा अन्य धनीण ना तुजविणा; शङ्का वृथा कां तरी ?

# सौख्याशा जळली....

[ वृत्त—शार्दूलविक्रीडित ]

सौख्याशा जळली ! जगांत कसलें तें श्रेय सम्पादणें ?
प्रेमावांचुनि वांचणें, मरण तें, धिग् रौरवाचें जिणें !
जो आशाङ्कुर वाढला न पुरता दैवेंच तो तोडला
आ वासून परिस्थिति प्रबल ती पाही गिळाया मला

लग्नाचा अपुला जुळून सहजीं ये योग तो मङ्गल
आशा गोड बळावली सुगृहिणी माझीच तूं होशिल
पोशिन्दे परि रूढिचे, हितरिपू हे आडवे येउनी
' शाखा, गोत्र जुळे न, ' ठाम वदती विघ्नें नवीं आणुनी

चित्तीं स्वार्थ पुरा दुराग्रह वसे साह्यार्थ घेती ग्रह
हुण्डा मङ्गळ मानपान करणी सौदा अनर्थावह
रूढी धर्ममिषें गुलाम बनवी लोकांस सत्ताबळें
रूढीला जन ' धर्म धर्म ' वदती स्वार्थान्ध सोयीमुळें

आशेनेंच जिवन्त आजवर मी, इच्छा खुळी निष्फळ
आशेनें मरतों, फलप्रद पुनर्जन्मीं तरी होईल

# तेव्हां आणि आतां

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

थाटोनी चिमणाच भातुकलिचा संसार तेव्हां भला
प्रेमें घालिसि हार सुन्दर मला मानोनियां ‘ नोवला ’
मीही पुष्प तदा सुवासिक तुझ्या वेणीवरी खोंवलें
लाजोनी हंसलीस तू, जणुं तदा तें दैवही हांसलें !

बाल्योद्यानिं सुखें सखे ! विहरलों एकत्र ते आपण
झालें जीवन एकरूप अपुलें लोपोनि मी–तू–पण
आतां आठवतां लहानपणिंच्या सौख्यस्मृती गोड या
धांवें दुक्ख दुणावुनीच हृदया शोकांत लोटावया।

आशा लावुनि सर्वकाळ बसलों मी ज्या गुलाबावरी
या जन्मीं तरि होत दुर्लभच तो आकाशपुष्पापरी
गेला गोड गुलाब पूर्वसुकृतें सौख्यांत नान्दावया
कांटेरी जग मात्र येथ उरलें जीवास टोंचावया

होतां पेटत जो उतावीळ सदा तेव्हां सुखाशेमुळें
आहे पेटत जीव तोच सखये ! आतां निराशेमुळें

# ताई !

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

या जन्मीं घडला वियोग अपुला आतां पुढें कायम
नैराश्यानल अन्तरीं धडधडे, जीवा जडे सम्भ्रम
आशातारक लोपला घन तमीं दुक्खासि नाहीं तुला
पूर्वीच्या मम भावना बदलल्या, 'ताई' वदे मी तुला

प्रीतीचा अपुराच हार ! सुमनें कोमेजलीं साजरीं
हें स्थित्यन्तर हो परिस्थितिमधें दैवानुसारी जरी
तोडोनीच ऋणानुबन्ध पहिला नातें नवें जोडिलें
लाभो सौख्य जगीं तुला सुचिर, हें देवासि मी प्रार्थिलें

मी या मानसपूजनीं नच जुना, ध्यातों नवा मन्त्र हा
आतां सूर निघे नवीन अवघा गाण्यांत माझ्या पहा !
आला मङ्गल आज सौख्यद अहा ! भाऊबिजेचा सण
भाई प्रेमळ हा तुझा स्वहृदया तूतें करी अर्पण

ईशेच्छा वितरी जगीं बलवती जीवास उद्बोधन
'ताई' हेंच तुला निरन्तर सुखें योजीन सम्बोधन

# निराशेंतील आशा

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

देखोनी बहुता दिनीं तुज गडे ! आनन्दलें मन्मन
हर्षोत्फुल्ल हृदब्ज गे जिवलगे ! प्रेमें करी नर्तन
लाभे सौख्य निकें सखे ! पण फिकें हें थोडकें मोजकें
हें त्वद्दर्शन दे तमासि उजळा विद्युल्लतेसारखें

आला योग अहा ! अकल्पितच हा, झाली पुनर्भेट कीं
द्याया धीर हताश शून्य हृदया ये स्वर्गदूती सखी
प्रीतीची परते पुन्हां तुजसवें पूर्वील सञ्जीवनी
मी गेलों विसरून या हृदयिंचीं शल्यें सदाचीं झणीं

जीवानें जगिं कण्ठिलें तुजविणा ते दों उन्हाळे जसे
दुर्दैवांत दिसें तसेंच लिहिलें शेषायु हें राजसे !
कोठोनी सहवाससौख्य मिळणें तूझें पुन्हां प्रेमळे !
केंव्हां नेत्र सहर्ष वर्षति सुधाधारा अशा नाकळे

माझी नित्य जपून ठेवशिल तू प्रेमस्मृति स्वान्तरीं
नैराश्यांतिल हीच एक सखये ! आशा अझूनी परी

२०-११ प्राप्त १।१।

# मानसपूजा

[ जाति–स्वर्गङ्गा ]

आयुष्याची आधिदेवता किशोर मूर्ति प्रेमाची
जीवन–सञ्जीवनी मोहिनी विजयपताका मदनाची

तू आशेची कलिका खुलती फुलती दुनिया नवतीची
चरणीं तुझिया जीव वाहिला कुरवण्डुन काया साची

मनोमन्दिरीं अविरत विलसे मुग्ध मनोहर तव मूर्ती
सतत तेवते जीवज्योती हृदयदेवते ! तुजपुढती

प्रतिदिनिं वाहुनि दल एकेकच नवविकसित हृदयाब्जाचें
अभङ्ग हें आचरिन शुभाङ्गे ! व्रत मम मानसपूजेचें

तुझ्या गुणांचीं स्तोत्रें मङ्गल भावभक्तिनें गात मुखें
निर्हेतुक मत्प्रेमामृतनैवेद्य अर्पितों तुला सुखें

मूलमन्त्र राजसे ! प्रेम हें दिव्य नियन्त्रण विश्वाचें
जडे समाधी गडे ! निरन्तर पारायण या मन्त्राचें

एकनिष्ठ तव भक्त सदा मी असेंच पूजिन शुद्ध मनें
आळवीन हृदयेश्वरि ! तुजला अखण्ड भोळ्या भावानें

काव्य 99588 12/7/38

# शिलालेख

[ जाति–चन्द्रकान्त ]

कालाब्धीचे तरळ उसळतां तरङ्ग उत्तुङ्ग
विरले झणिं वरवरले नटव्या प्रीतीचे रङ्ग

आशेच्या स्वर्गांत तूच मज उन्च उन्च नेलें
घोर निराशागर्तेमधिं कां वद मग फेंकियलें ?

लोटुन दे खवळल्या सागरीं फुटकी नौका ती
मरेन मी परि मत्प्रेमाला मरण न कल्पान्तीं

तुझ्या हृदयपाषाणिं कोरिला साक्षी काळाचा
शिलालेख तो सद्भावाचा प्रीत–जिव्हाळ्याचा

परस्परांच्या प्रणयाचा तो जिवन्त इतिहास
समर्थ नाहीं कृतान्तकाळहि जगिं नाशायास

त्या लेखावर विस्मृतिचीं जरि पुटें माजतील
पश्चात्तापाश्रू तीं सारीं धुवुन काढतील

सजल नयनिं तव नाचुनि माझी मूर्ति अहोरात्र
' प्रेम अमर निस्स्वार्थी '–पढविल हाच दिव्य मन्त्र

# साधलीस शिकार !

[ वृत्त–विबुधप्रिया उर्फ चर्चरी ]

प्रीतिचे किति खेळ खेळुनि ते तसे नटचञ्चले !
मोहिलें मन हें खुळें पण राजसे ! मज वञ्चिलें

भावसिन्धु अथाङ्ग, माणिक मोति भासति हांसती
हातिं लागति मात्र शङ्खच, आस निष्फळ खास ती

चन्द्रिका रिझवी सुधामय झोंत वर्षुनि हांसरी
मस्तकीं बिजली तुटे परि ! अग्निच्या जळत्या सरी

चान्दणी नभिंची गुणी झणिं झेलण्या हृदयान्तरीं
हांवरें मन धांवलें पण धोण्ड कोसळली शिरीं

बाग तो बहरेल सुन्दर जादुचा हृदयीं नवा
स्वप्न हें विरलेंच, फत्तर–रास ही रचिली तुवां

प्रीतिच्या कलिका करीं तुझिया दिल्या झट कुस्करी
साधलीस शिकार तू ! पण कां पुन्हां खट मस्करी ?

जीव हा दुखरा खरा ! डिवचूं नको व्रण तू अशी
कोणता तुज लाभ तो ? हिणवोनि कां वद हांसशी ?

# मुरलीविण

[ जाति–चन्द्रकला ]

अङ्गीं चर्चियली   गोमटी उटी चन्दनाची
खळी खुले गालीं   उमलतां कळी सुहास्याची

माथां   शोभतसे   किरिट हा मोरपिसाऱ्यांचा
नाम   रेखियेला   ललाटीं केशरकस्तुरिचा

तुरे   पल्लवांचे   कोंवळे खोविसि घननीळा !
रानफुलांची   ही   साजरी कण्ठीं नव माळा

प्रभा   झळकताहे   कानिं तळपत्या कुण्डलांची
भारितसे   जादू   हांसऱ्या लोचनरत्नांची

नागबन्दि   शोभा   झळाळे पीताम्बर कांसें
कटि कर ठेवुनियां   गोजिरा बालमुकुन्द हंसे

तेज   वदनिं   खेळे   आगळे कोटि रवीहूनी
हंसती दाहि दिशा   कान्तिनें नितान्त उजळोनी

उगाच   वनमाली !   दाविसी नवीन नवलाई
हा शिणगार फिका   एकल्या मुरलीविण बाई !

# ती खरी सौन्दर्य-शोभा

[ गज़ल-पाण्डव ]

आवडे तूझा गडे ! हा  वर्ण काळा सांवळा
हासुं दे कोणी मला कीं  ' काय भोळा बावळा ! '

अन्तरङ्गा पाहिना जो  बाह्य रङ्गा भाळला
तो खुळा डोळे असोनी  मानितों मी आन्धळा

छान गौरीचे मुखोटे !  रूप गोरे गोमटें
लाजवी काळीज काळें  तें परन्तू काजळा

बाहुल्या रङ्गीत साऱ्या  त्या विलासी पाहुनी
जीव वेडावे जसा कीं  साखरेला डोङ्गळा

शाश्वतीची प्रीत नोहे !  मोह सकृद् दर्शनीं
वासना स्वार्थी विषारी  प्रेम मानी वेन्धळा

ना कधीं सत्प्रीतिला तो  बाह्य रूपाचा ळळा
अन्तरङ्गींच्या गुणांचा  रङ्ग मोही आगळा

ती खरी सौन्दर्यशोभा  पात्र हो प्रेमादरा
अन्तरीं जी सद्गुणांची  कान्ति कोन्दे निर्मळा

५६२८

# समदुक्खी

[ जाति—चन्द्रकान्त ]

म्लान—वदन जडं शून्य मनें कां सुधाकरा ! भ्रमशी ?
सन्थपणें कां गगनपन्थ हा सन्तत आक्रमिशी ?

अन्तरङ्गिंचें तुझें साङ्ग मज गूज सख्या ! सारें
स्वर्गांतहि कां प्रेम अलौकिक ठरतें खूळच रे ?

तुझी चालचर्याच हृदयिंचें शल्य वदे चन्द्रा !
मनोवेदनानिवेदनाला साक्षी तव मुद्रा

प्रणयविकल तू खास चुकेना हा माझा होरा
स्वर्गांतहि चालवी पञ्चशर कां घातक तोरा ?

इथें प्रीति—बाजार थाटती रमणी नटशीला
सद्गुण मानिति कृतघ्नता कां तिथेंहि सुरबाला ?

मस्त समस्त विलासी ललना प्रियकरांसि छळिती
इथें तशिंच कां तिथेंहि जहरी सौन्दर्यें वसती ?

जमीनअस्मानांचें अन्तर आपणांत राहे
मनें मिळालीं समदुक्खी पण परस्पर स्नेहें

## प्रणयवञ्चितेचे उद्गार

[वृत्त–शार्दूलविक्रीडित]

स्वार्थी साधुनि शेवटीं फसविलें भोळ्या जिवाला खला !
जन्माची बघ होय धूळ ! मुकल्यें लोकांत मी अब्रुला
निन्दा घोर असह्य चालत जनीं, वैतागला जीव हा
मृत्यूवांचुनि कोण टाळिल अतां निर्भत्सना ही महा !

नेणें मत्सम पापपङ्कि अबला गायी किती लोटुनी
डोळें पोकळ सभ्य वेषिं फिरशी लज्जेसि गुण्डाळुनी
मोदें लोळशि वैभवांत जरि तूं दुष्टा ! सुखें सम्प्रती
दुष्कीर्ती जगतीं तुझी, नच टळे मेल्यावरी दुर्गती

कामान्धा ! चुरडून मूक कलिका ही काय तूतें मिळे ?
चाखाया जरि चोखटीं न पचतीं तीं दुष्कृतींचीं फळें
चाण्डाळा ! बहु पापराशि रचिल्या निश्शङ्क तू चोरुनी
अन्तीं रौरवयातना तव मना देतील विस्तारुनी

अन्यायी पुरुषी समाज पुजुं दे ! हो न्याय देवाघरीं
पापांचा भरला घडा फुटतसे जन्मांत केव्हांतरी

# देवा ! निराशाच दे

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

आशा अन्धुकही जिवास दुबळ्या होते जगाया पुरी
आशेवीण अशक्य जीवित जगीं प्रेमी जनांचें तरी
जी जी गोड गणोनि मी कवळिली आशा मुर्दे अन्तरीं
अन्तीं काळिज कांपुनी फसवुनी ती ती निमाली परी

वाटे चञ्चल घातकीच नटवी ही दुष्ट वाराङ्गना
चित्तोद्वेग दुणावुनी वितरिते नानापरी यातना
मायाजाल जिवावरी पसरुनी दुक्खें नवीं वाढवी
ऐशी ही मृगनीरशी असुखदा आशा कशाला हवी ?

वेडे पीर तिला कितीक भजती एकाग्रचित्तें तरी
कोणाची कधिं येतसे जगिं पुरी आशा फळाला परी ?
आशानाश अतीव कष्ट वितरी चिद्वृत्ति हो घाबरी
जीवाची समतोल वृत्ति बनवी ती ही निराशा बरी

आशेचें न मुखावलोकनहि तें कालत्रयीं होउं दे
आतां कायमची अशीच मजला देवा ! निराशाच दे !

# दुर्दैवास आव्हान

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

नाहीं फार जरी प्रवास जगतीं माझा असे जाहला
आलों चालुनि मार्ग कांपित कसा ठाऊक माझें मला
जीवाला जखडे परिस्थिति, पुढें दुर्दैव माझें खडे
दुक्खांचे तुटलें शिरीं किति कडे, नैराश्य चौंहींकडे
वाटे धीर जसा जसा परि वयोमानीं जगीं या चढे
भक्तांचें प्रभु तो दयाघन सदा वारीतसे साकडें

दुर्दैवा ! तुजशी जरी कितिकदां केला महासङ्गर
ठाके ठोकुनि दण्ड मी अजुनिही झुन्झावया बेडर
बान्धाया नच तीव्र बन्ध शकती दैवा ! तुझे हे मला
कोणालाहि कुठें कदापि जगतीं हा जीव ना बान्धला
अङ्गीं सत्व नि शुद्ध शील असतां दिव्यायुधें हीं मला
माझें ध्येय पवित्र गांठिन जरी कल्पान्तही पातला

झालों धीट पुरा खराच; अदया दैवा ! कुठें धांवशी ?
ये ! ये ! मी बघतों करामत नवी तू कोणती दाविशी

## कदम्बपुष्पास

[ वृत्त-वसन्ततिलका ]

सौन्दर्य दिव्य तव गोण्डस गोजिरे बा !
आनन्दलें रसिकचित्त अहा कदम्बा !
हा रम्य रङ्ग खुलता भुलवीत ऐसा
वेड्या जगा झुलवितो बहिरङ्ग खासा

हा गोड सुन्दर दिसे वरचा सुरङ्ग
कोणी वदे, ' जहर मादक अन्तरङ्ग '
हे बोल सत्य तरि धिक् शतधा खला रे !
पापी अमङ्गळ जळो तव रूप सारें !

ना चारु गन्ध परि केवळ डामडौल
सत्कीर्तिचा तुज कसा मिळणार कौल ?
या नाशवन्त वरच्या भपक्यास बोल !
देईल कां कधिं कुणी कवडीहि मोल ?

जो दुर्गुणी परि दिसे मदनासमान
देती तया सुजन ते लवही न मान

# आज उद्यां

[ जाति–स्वर्गङ्गा ]

निष्फळ गेला क्षण न परत ये सुटला वाऱ्यावर बाण
चोरित जीवितधना क्षणोक्षण काळ–चोर हा विलक्षण

त्यजुनि हस्तगत ' आज, ' ' उद्यां 'च्या धांव नको पळत्यापाठीं
पुढें पुढें पळतो, न थाम्बतो काळ जगीं कोणासाठीं

क्षण मोलाचा व्यर्थ दवडितां अनर्थ हो अक्षम्य गुन्हा
काळ–लाट चञ्चळ ओसरतां स्वर्णसन्धि ये कुठुनि पुन्हा !

' भूत'काळचीं भुतें भयङ्कर ' भविष्य ' भीषण भिवविं मनीं
' वर्तमान ' हा वन्द्य विचक्षण मार्गदर्शकच काल–वनीं

आठवुनी गतकाल निज मनीं नजर भविष्यावर ठेवा
वर्तुनि नित अनुकाल राबवा वर्तमान सौख्यद ठेवा

' आज ' अशाश्वत खचित मरोनी भूतकाळचें हो भूत
घ्या साधुनि अनुकूल परिस्थिति आहे जोंवर उद्‌भूत

विसम्बून कां उद्यांवरी मन भाम्बावुन करि निज घात !
' आज ' सुरक्षित, उद्यां अनिश्चित, आज–उद्यांची कां बात !

स्थळ प्रत
नं.
ता.

## बांसरी

[ गज्जल–' अगोट ' ]

जिवास कृष्णसख्या ! बांसरी तुझी रमवी
निनाद गोड मनीं प्रीतिनाद हा घुमवी

सुधाच वर्षुनिया जीव–राजिवा फुलवी
नितान्त माधुरिची जादु या जगा भुलवी

हळूंच ठेवुन ओठावरी कशी सहजीं
मजेंत वाजविशी, माधुरी अखण्ड नवी !

मुळीं न सूर निघे मी जरी धरी अधरीं
नसे मला वश ही काय मत्सरी नटवी ?

तुझींच नाजुक बोटें हिच्यावरी फिरतां
मधूर बोल कसे बोलते पहा सटवी !

कधीं मनावर ना घेशि, रोज मी विनवी
अतांच मन्मनिंची हौस एव्हढी पुरवी

असाच कुञ्जवना शामसुन्दरा ! चल नां
मलाहि बन्सि तुझी वाजवावया शिकवी

# इश्काचा बगीचा

[ गज़ल–वसन्त ]

फुले गुल्जार इश्काचा बगीचा गार दिल्प्यारा
खुले सब्दूर नौतीचा नव्हाळी–नूर हा न्यारा

इथें हा और दिल्रङ्गी खुषीचा खेळ जादूचा
वसन्ताची अलेजाही सदा जल्लोश जल्शाचा

किती शृङ्गार–कारन्जी मजा रङ्गेल ढङ्गाची
विलासी रङ्गली लीला स्वयंसम्राट् अनङ्गाची

फुलोरे लाजवन्तीचे सुधेची बुल्बुली बोली
ाबी रोशनी नाचे सुखाशा हांसरी भोळी

ले डौलांत मस्तानी दिलाची बागशाही ही
झुले, कीं झिङ्गली सारी शराबी धुन्दिनें, मोही

झुरे स्वच्छन्द उन्मादी भरे अङ्गीं जवानी–जोश्
भुलोनी नन्दनाभासें रमाया जीव हो बेहोश्

परन्तू बावळ्या जीवा ! जरा तू थाम्ब, कां घाई !
हिताचा थोडका माझा इशारा ऐकुनी जाई

# इशारा

[ गज्जल—वसन्त ]

खुली खैरात इश्काची लुटायाला खुमारीची
म्हणोनी हावरी वेडी तुझी कां धांव जीवाची ?

जपूनी चाल, धोक्याचा बडा मुश्कील इश्काचा
दिसे तैसा सिधा रस्ता नसे आराम—सौख्याचा

सराटे संशयाचे हे विषारी मत्सरी कांटे
जिवाची चाळणी होई निराशा क्रूर कोन्दाटे

इथें ही मोहिनी—माया भलाई नाटकी नाचे
इमानी इश्कबाजीच्या नशीबीं आग प्यायाचें !

सुगन्धी रङ्गतां स्वप्नें मनानें गूढ खोलावें
जिव्हाळ्याचेच ते सच्चे जिवानें बोल झेलावें

वळाया कष्ट जेथूनी दुरी ना एव्हढें जावें
विवेका सङ्गतीं घ्यावें धिमे पाऊल टाकावें

नसे ही बाग इश्काची असे ही आग दुक्खाची
जिवाचें शिम्पतां पाणी जित्या जोमें फुलायाची

# कोकिळेस

[ गजल—उषा ]

तुझे तापदायी हे स्वरालाप कोकिळे !
गमे माझिया माथां कुणी ठोकिती खिळे

जिवाचा तुझा राजा निमाला वसन्त हा !
उन्हाळा अतां जाळी तुला कैंवि ना कळे ?

नको त्रासवूं वायां तुझा मोकळा गळा
तुझ्या गोड गाण्यानें कुणा सौख्य ना मिळे

जगाला पुन्या ठाव्या तुझ्या दुर्गुणी कळा
कशाला खुळे चाळे ? तुझें चित्त कां चळे ?

तुझीं तान्हुलीं बाळें तुझ्यावीण पोरकीं
दुजाहातिं पोसाया कशी देशि आन्धळे !

जगीं जन्मदात्रीचा जिव्हाळा लळा मुलां
फुटे कां खरा पान्हा जरी दुष्ट कावळे ?

जिणें थोर मातेचें सुदैवेंच लाभलें
परी टाळशी दुष्टे ! स्वकर्तव्य कां बळें ?

# फुलाची प्रार्थना

[ गज्जल-आनन्दकन्द ]

सौन्दर्य — वैभवाच्या जीच्या सुदिव्य तेजें
रम्भाहि रूपराज्ञी स्वर्गीं मनांत लाजे
मानी विलासिनी ती ! तन्मस्तकीं वसावें
सद्भाग्य हें परन्तू दैवीं मला नसावें

यत्कीर्तिचा त्रिखण्डीं डङ्का अखण्ड वाजे
होतात नम्र पायीं ज्याच्या बलाढ्य राजे
सम्राट् कुणी विलासी ! हातीं तयें धरावें
पुरुषार्थ काय माझा ! त्यासाठिं मी झुरावें ?

पूजार्पणीं तुझ्या रे ! देवा ! घडोनि सेवा
दीनासि उद्धरोनी देशील मोक्षमेवा
तें स्वर्गधाम लाभे आकाशपुष्प शोभे
ध्येया त्यजूं परन्तू कां स्वर्गसौख्यलोभें ?

स्वातन्त्र्यवीर—पायीं माझी तनू झडावी
निस्स्वार्थ देशसेवा कांहीं प्रभो ! घडावी

# ध्वजारोपण

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

आला हा गुढिपाडवा सण नवा आनन्ददायी महा
नेणें कोठुनि शब्द येति घुमती कानीं मनीं हे पहा !
' नान्दोनी नरकीं गुलामगिरिच्या जीवन्मृतासारखे
कां हो दीन विवेकहीन बनलां सौख्या जगीं पारखे ! '

'सिंहानीं जगतीं श्व–वृत्ति वरणें, लाजीरवाणें जिणें
मर्दानीं रडणें अखण्ड दुबळी धिक् षण्ढता दाविणें !
ऐक्याची भडके चिता सकळ ती सौभाग्य जाळी तरी
मोदें मङ्गलदर्शिका उभाविणें कां हो ध्वजा त्यावरी ! '

' बिम्बेना मनिं धर्म–मर्म कवणां, निस्सत्व रूढी उरे
सोहाळे सगळे तिचेच जगतीं हे माजलेले पुरे
झाली दास्यविमुक्त राष्ट्रजननी तो भाग्यशाली क्षण
सोन्याचा उजवावया दिन नवा तेव्हां ध्वजारोपण ! '

देशाची भवितव्यताच मजला ऐसें बजावी जणूं
तो सन्देश पवित्र उज्वल तिचा खोटा कसा मी म्हणूं !

# धर्माचे तुम्हि मायबाप

[ वृत्त-शार्दूलविक्रीडित ]

सौख्यें ऐहिक पारलौकिक तशीं सम्पादुनी सोज्वळ
आत्मोत्सर्गपदां जनार्दनपदां सेवोनियां मङ्गल
संसारीं परमार्थ थोर सहजीं स्वार्थासवें साधुनी
सन्तोषें तरले भवाब्धित किती राजर्षि साधू मुनी
साधें पुण्यद साधु सन्त कथिती एकादशीचें व्रत
सेवी भाविक भक्त मोक्षपदवी तें आचरोनी नित

राष्ट्राचा सजला विराट गमला संसार तो साजरा
लीलालालस तो प्रभु प्रकटला लोकस्वरूपीं खरा
देहीं ना धड वस्त्र जीर्णहि पुरें अब्रूस झांकावया
पोटाला न शिळें कदान्नहि मिळे भर्पूर तें खावया
दारिद्र्यातळिं लाख जीव बुडती, ऐशा अपङ्गांस या
—लाभे दैवबळें तुम्हां सधनता, दीनांसि दावा दया

द्या त्यांना नव अन्नवस्त्र, नशिबीं ज्या नित्य एकादशी
धर्माचे तुम्हि मायबाप ! पदरीं घ्या पुण्य एका दिशीं

११ १२८८६

## काव्यनिर्झर

[ जाति--चन्द्रकान्त ]

हृदयप्रान्तीं निर्मळ निर्झर वाहे काव्याचा
तिथें बहरला स्वर्गच साचा दिव्यानन्दाचा

उगम पावला उदात्त उद्देशाच्या उदरांत
सुकल्पनांच्या कड्यावरुनि घे उड्याच दिनरात

दृष्टान्ताच्या दरींत दडली शब्दांची माया
गूढार्थाची गभीर दुनिया सहजीं सजवाया

विचार–तुषार वेंचुन गुम्फित एकसरी साची
मोहनमाळा नव्या जादुची अमोल नवलाची

भावरसाचे भरुनी पेले दे प्रतिभादेवी
रसिक सुजनगण काव्यामृत हें प्रेमानें सेवी

हृदय नाचतें उल्हासानें रसवन्तींसङ्गें
काव्यानन्दीं गानतरङ्गीं आन्दोलत रङ्गे

हृदय–तृषा ना शमवि, वाढवी परी सर्वकाळ
झुळझुळतें सङ्गीत उधळुनी गुङ्गवि लडिवाळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, स्थल प्रत ११५८८ काव्य

## भोळा शङ्कर

[ जाति–चन्द्रकान्त ]

पटला साक्षात्कार मनाला टीकाकार न तू
प्रलयङ्कर परि भोळा शङ्कर ! यांत नसे किन्तु

साष्टाङ्ग प्रणिपात हा तुला ! ऐक एक विनती–
सदा जागती कृपादृष्टि तव ठेवी मजवरती

त्रिकालदर्शी तृतिय नेत्र तव दिव्य विचित्र महा
जें नाहीं तें दावि नेमके जादूगारच हा

शृङ्गी भृङ्गी किती सभोंतीं नाचतात नन्दी
अकाण्डताण्डव शिवताण्डव कीं प्रलयाची नान्दी !

कृष्ण सर्प किति सदर्प जहरी गळ्यांत बाळगशी
मस्तक उन्नत, अर्धचन्द्र तू सकळां दाखविशी

उग्र परी उपकारक दैवत तू ! तुज जो भ्याला
नर तो भोळा खुळा जगीं या पात्र न जगण्याला

तुझें ध्यान गम्भीर खेळतें नयनीं दिनरात्र
गात गुणांचें स्तोत्र अर्पितों भक्तिबिल्वपत्र

# एकशें पांच

[ जाति—स्वर्गङ्गा ]

तेतिस करोड बन्धू आम्ही पन्थ निराळे जरि अमुचे
हिमतींचे नव अचल हिमाचल ! विभव वाढवूं राष्ट्राचें

मतामतांचा विरोध होतां स्वधर्मजातीस्तव भाण्डूं
सत्वासाठीं स्वातन्त्र्याचें सङ्गर परि सारे माण्डूं

जैन शीख ज्यू मुस्लीम् ख्रिस्ती हिन्दु पारशी धर्मांचें
सप्तरङ्गिं रङ्गलें हृदय हें धवल एक पण हिन्दाचें

दख्खन कन्नड उत्तरवासी कुणि मद्रासी गुजराथी
हिन्द जननिचे सुपुत्र सारे कुठे कुणाची जरि वसती

राष्ट्रलतेवर फुलेंच फुललीं सुन्दर हीं नव नवलपरी
ऐक्यप्रेमाचा दरवळतो सुगन्ध अवघा दिगन्तरीं

राजदण्ड थोपले प्रचण्ड नि भङ्ग पावले यमदण्ड
अखण्ड नाचे उदण्ड अमुचें शौर्य नाचविल ब्रम्हाण्ड

बन्धू बन्धू विभक्त आम्ही शम्भर आणि जरी पांच
'पञ्चाधिक शत' आहोंतच हो ! समान ध्येयास्तव साच

# प्रीतिलेख

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

वेडे कैक पतङ्ग, दीपकळिला ज्यांनीं जिणें वाहिलें
प्रायश्चित्तहि साहिलें, स्वनयनीं कीं मृत्युला पाहिलें
स्वार्थी कामुक पाशवी प्रणय तो दुर्वासना–रौरव
नैष्ठुर्यानृतदम्भशाठ्यकृतिचा चाले तिथें गौरव
बाले ! चञ्चल हीन वञ्चक तुझी दावूं नको प्रीत ही
प्रेमाचें तव दुष्ट दाम्भिक जगा ! पापी जळो नांवही !
सोङ्गांना नटव्या भुलें न मन हें, धिग् मोह–हालाहला !
साक्षात्कार विवेकशील हृदया सत्प्रीतिचा जाहला

' दे–घे ' आणिक ' मी नि तूं ' नच जया, शक्ति प्रभावी महा
प्रेमा उज्वल दावि जीवितपथीं ध्येयासि निष्काम हा
सेवा त्याग नितान्त शान्ति सुख दे, एकत्र हो स्वर्गभू !
नान्दे सत्य पवित्र मङ्गल जगीं प्रेमस्वरूपें प्रभू
आतां हृत्पटलीं अखेर लिहिला रक्ताश्रुंनीं हा पण
प्रीतीचा नव लेख सादर असो प्रेमी जनां अर्पण

# एकच !

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

जीवाधार जगांत एकच मला प्रेमी सखा लाभला
सौख्याचा सहकार कल्पतरुसा पृथ्वीवरी शोभला
तो हा उन्मळला अकल्पित कसा, आक्रान्त माण्डी बळें–
झन्झावात कुदैव ! जीवनलता मातीस माझी मिळे !

आनन्दें गुणगन्ध गोड उधळी स्वच्छन्द डोले सुखें
होतें एकच फूल सुन्दर किती माझ्या जिवाचें सखे !
दुर्दैवें परि तेंहि काय गळुनी जावें अकालीं नव
हें भूभारच शुष्क रुक्ष अवघें भासें जिणें रौरव !

चित्तीं एकच जों पुरा उगवला नाहीं सुखाशाङ्कुर
गेला तोंच जळोनि पार विलया, जाळोनि अभ्यन्तर
कोन्दाटे घन अन्धकार हृदयीं दाटे निराशा अतां
वाटे शून्य मनास शून्य जग हें निस्सारसें तत्त्वतां

त्राता तो जगदीश एकच जगीं जीवा निवारा खरा
त्यातें एकच याचना–' झडकरी दे त्वत्पदीं आसरा '

# धिक्कारोत खुशाल

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

‘ नाहीं ह्य रसाळ सद्गुणवती विद्वन्मनोमोहिनी ’
‘ तेजस्वी प्रतिभा–प्रसाद–विमल–प्रज्ञा–सुधावाहिनी
‘ टाका जाळुन ही भिकार कविता ’–तूतें तिरस्कारुनी
पाण्डित्य प्रकटावया निज असें गर्जेल विद्वान् कुणी

वेडे ! सोडुनि चाललीस मज कां या लोकनिन्दाभयें
माझें ऐक जरा विवेक वरुनी, जाऊं नको, थाम्ब, ये !
नाहीं एकहि वस्तु या जगिं पुरी निर्दोष जी निस्तुला
व्हावें आदरणीय लोकिं सकलां ही कां अपेक्षा तुला ?

मृत्यू खास चुके न तो, तरि कुणी कां आत्महत्त्या करी ?
एकाला विष तें दुजा अमृतसें, हें सत्य लोकान्तरीं
कानानें बघते दुतोण्डि दुनिया, दे ना गुणां मोल तें,
दृष्टीकोन तिचा जसा तशिच ती निन्दास्तुती बोलते

धिक्कारोत खुशाल हे जन, मुर्दे वानोत किंवा तुला
राहे मद्हृदयान्तरांत कविते ! तू प्यार माझी मला

## मी गाणार असाच

[ वृत्त—शार्दूलविक्रीडित ]

जल्सा ऐन भरांत ! रङ्ग चढला, हें चित्त हेलावलें
वाटे विश्व मदीय थोर हृदयब्रह्माण्डि सामावलें
डोले नादतरङ्गिं रङ्गुनि सुखें आत्मा समाधींत हा
ये रे ! ये रसिका ! तुझें मन गुणग्राही रिझाया अहा !

तारा मृङ्ग विहङ्ग सुन्दर फुलें गन्धाढ्य हीं गोजिरीं
ही तेजाळ अथाङ्ग सिन्धुतळिंची रत्नावली हांसरी
हा मन्दानिल, शृङ्ग तुङ्ग गिरिचे, शृङ्गारलें अम्बर
साथीदार निसर्ग मङ्गल वदे, ' गा गोड गाणीं चिर '

आशास्वप्न सुरम्य बाळपणिंचें आनन्दवी मन्मना
प्रीती लाजुन गोड गोड हंसतां बेभान हो भावना
काव्यस्फूर्ति उचम्बळें सहज ही माझी मला नावरे
रोधाया धजसी वृथा कवण तूं तीतें स्वयंमन्य रे !

जा—जा ! कां मज गाञ्जसी अरसिका ! गातां गळा दापिशी
मी गाणार असाच ! वृत्ति बहरे ही स्वैर वेडीपिशी

# मी गाणार असाच

[ वृत्त-शार्दूलविक्रीडित ]

जल्सा ऐन भरांत ! रङ्ग चढला, हें चित्त हेलावलें
वाटे विश्व मदीय थोर हृदयब्रह्माण्डि सामावलें
डोले नादतरङ्गि रङ्गुनि सुखें आत्मा समाधींत हा
ये रे ! ये रसिका ! तुझें मन गुणग्राही रिझाया अहा !

तारा मृङ्ग विहङ्ग सुन्दर फुलें गन्धाढ्य हीं गोजिरीं
ही तेजाळ अथाङ्ग सिन्धुतळिंची रत्नावली हांसरी
हा मन्दानिल, शृङ्ग तुङ्ग गिरिचे, शृङ्गारलें अम्बर
साथीदार निसर्ग मङ्गल वदे, ' गा गोड गाणीं चिर '

आशास्वप्न सुरम्य बाळपणिंचें आनन्दवी मन्मना
प्रीती लाजुन गोड गोड हंसतां बेभान हो भावना
काव्यस्फूर्ति उचम्बळें सहज ही माझी मला नावरे
रोधाया धजसी वृथा कवण तूं तीतें स्वयंमन्य रे !

जा-जा ! कां मज गाञ्जसी अरसिका ! गातां गळा दापिशी
मी गाणार असाच ! वृत्ति बहरे ही स्वैर वेडीपिशी

# निन्दकांस

[ जाति—भूपतिवैभव ]

चल, हाण बळें निन्देचे निष्ठुर घाव
तव मति—निकषावर मत्कृति कसास लाव
कर धूळफेंक मळवाया माझें नांव
लागुं दे पुरा मज तुझ्या कुवतिचा ठाव

तुजविणा मुळीं ना जगीं यशासि महत्त्व
प्रगतिला सहाय्यक तूच ! सत्य हें तत्त्व
पथिं पसरुनि सङ्कटकण्टक बघसि न सत्व
तरि दुबळें माझें जळो जिणें निःसत्व !

वाढवी तिमिर तेजाची महती शोभा
खल निन्दक वाढविती हे सुजन—यशोभा
वाञ्छिती सन्तही सन्तत तव शेजार
उजळवी आत्मबळ रिपुचा छळ जोजार

जरि कधीं कुमुदबान्धवा ग्रहण खग्रास
तो शतगुण तेजें पुनश्च विलसे खास !

# गरीबांचें गाऱ्हाणें

[ अभङ्ग ]

गरीबांची वणवण
जगीं चाले देवा ! पण—
मन्दिरांत तुला कां रे
ऐश्वर्याचे भोग सारे ?

अन्नू पुरी झांकाया ही
धड चिन्धी देहीं नाहीं
वस्त्रालङ्कारांच्या राशी
तूतें मोलाच्या मिराशी !

भाकरी ना ओली सुकी
तुझीं पङ्गू बाळें भुकीं
नित्य उन्ची पक्वान्नांचा
थाट तुझ्या नैवेद्याचा !

लाज तुझी तुला खरी
जड पाषाण तूं तरी !

# आटला कां प्रेमपान्हा ?

[ अभङ्ग ]

पोर हट्टी नि छान्दिष्ट
कांहीं नेणे इष्टानिष्ट
नादावलें भोळे खुळें
परी पस्तावे, व्याकुळे

माय साण्डीतां जिव्हाळा
कोण देई थारा बाळा ?
प्रभो ! कोण तुझ्यावीण
अन्तरींचा हरी शीण ?

तुझ्या मायेची दुशाल
दोष झांकील खुशाल
करुणेची कृपादृष्टी
फुलवील जीवसृष्टी

बघ व्याकूळला तान्हा
आटला कां प्रेमपान्हा ?

# सर्व सुखाचे साङ्गाती

[ अभङ्ग ]

सदा खिशावरी डोळा
स्वार्थी जग भोंतीं गोळा
होतां अपेक्षा निष्फळ
थाम्बे जिव्हाळ्याची कळ

स्वार्थ साधल्यानन्तर
स्नेह देतसे अन्तर
ओसरतां द्रव्यपूर
लोभ पळे दूर दूर

बहरतां वृक्षवेली
मौज पाखरांनीं केली
वृक्षवेलींचा खराटा–
होतां गेले बारा वाटा

सर्व सुखाचे साङ्गाती
खाती तोंपर्यंत गाती !

[ अभङ्ग ]

# प्रचीतीचे विष-घट

जग दुटप्पी दुहेरी
कार्यसाधू सन्धि हेरी
तोण्डापुढें स्तुतिपाठ
निन्दा, फिरतांच पाठ

शिष्टाचार झांकी ढोङ्ग
सभ्यतेचें सारें सोङ्ग
नटे बहूरूपी ठक
नित्य चाललें नाटक

अङ्गीं नाहीं तें दाविती
रीत शिष्ट सम्भाविती
हवी सवङ्ग प्रतिष्ठा
मनीं नाहीं कार्यनिष्ठा

प्रचीतीचे विष-घट
किती प्यावें घटाघट ?

# देव देवपणा टाकी

[ अभङ्ग ]

गळ्याभोंवतींचा हात
लावी गळ्यालाच तांत

नम्र होतां पायीं माथा
निष्ठुरता हाणी लाथा

विश्वासाची गळचेपी
बेमानी ती मुण्डी कांपी

स्नेहें जुळे हातीं हात
घात करी हातोहात

लोभ खोटा अति लवे
करी दाम्भिक आर्जवें

द्वेष मत्सरच पोटीं
परी मिठ्ठे शब्द ओठीं

माणसा न माणूसकी
देव देवपणा टाकी

# जीव प्याला आगजाळ

[अभङ्ग]

जग बहुरूपी रङ्गे
कसें धांवावें त्यासङ्गें ?

माणुसकीचा अभाव
परी धर्मात्म्याचा आव

दक्ष पुरा स्वार्थी भाव
त्याचें ' व्यवहार ' नांव !

मन मारोनी जगावें
स्तोत्र रूढीचें कां गावें ?

स्वीकारूं कां उफराटी
शिष्ट जगाची रहाटी ?

आत्मवञ्चनेचें पाप
आत्महत्त्या आपोआप

पापभीरु तिन्ही काळ
जीव प्याला आग-जाळ

# देह पडो ध्येयापायीं

[ अभङ्ग ]

रङ्ग जगाचे देखून
अन्तरङ्गीं पटे खूण
व्यर्थ भोंतींचा जञ्जाळ
मृगजळ, माया–जाल

निर्वाणीची येतां घडी
तूच सखा संवगडी
हात करुणेचा देशी
तांतडीनें उडी घेशी

येऊं देत येती किती
सङ्कटांची नाहीं क्षिती
धैर्य तेवढें लाभूं दे
वरदान हें देवा ! दे

चित्त लीन तुझ्या ठायीं
देह पडो ध्येयापायीं !

# श्रद्धा

[अभङ्ग]

न्याय दया प्रीती स्वार्थपरमार्थ
प्रपञ्च परार्थ सत्यासत्य

कर्तव्याकर्तव्य विकारविचार
धर्मरूढाचार पापपुण्य

मनीं रात्रन्दिन चाले द्वन्द्वयुद्ध
मी तो अप्रबुद्ध भाम्बावलों

जगाचीं जिवाचीं सुटेनात कोडीं
आटापीट थोडी केली नसे

लोक–व्यवहार नीति–धर्म–कर्म
साळसूद वर्म उमगेना

पापभीरु मन, विवेक अन्तरीं
वैरी ठरे परी माझा मीच

चित्त भ्रान्त पण श्रद्धा दृढ होई
आन्धळ्याच्या गायी राखी देव

## ठाकलों सङ्गरीं

[ अभङ्ग ]

प्रभो ! हा संसार अखण्ड आजन्म
चालला सङ्ग्राम घनघोर

जमले सभोंतीं आप्त इष्टमित्र
सारें गण गोत्र माझें माझें

पढीक पाण्डित्य झालेसें निकामी
गुणबळ कामीं येईनाच

मिरविणें जगीं खोटीच बढाई
लढाई चढाई अङ्गीं येई

निभाव लागेना, अभयाशीर्वच
कृपेचें कवच लाभो तुझें

तू माझा सारथी जीवितसङ्गरीं
संसारसागरीं कर्णधार

ठाकलों सङ्गरीं परी मी दुर्बळ
तुझें पाठबळ देई देवा !

१३२५ ४ १२।७।३८

## सहचारिणीस

[ वृत्त–शार्दूलविक्रीडित ]

‘ हा संसार असार दुक्खद निका सारा पसारा फुका ’
सन्तांचे मज बोल फोल गमती, विश्वास मी ठेवुं कां ?
जाचे संसृति–तापना पण कधीं मद्वृत्ति ना बावली
त्वद्रूपीं प्रभुचीच पूर्वसुकृतें लाभे कृपासांवली

नेतां घातक मोहपाश कुपथा मातें स्वभावेंच ते
त्वच्चारित्र्य पवित्र शक्ति अतुला मागें मला खेचते
हृद्राज्ञी सहचारिणी भवरणीं तूं गेहिनी ! तारिणी
कान्ता प्रेमळ सत्वशील चतुरा सत्प्रेरणाकारिणी

संसारीं गृहिणी सखी सचिवही, या थोर कव्युक्तिचें
तू प्रत्यन्तर मूर्त, धाम शुभ वा साक्षात् चतुर्मुक्तिचें
या गेहीं गुणसुन्दरा विहरशी तू मङ्गला इन्दिरा
माझी लाजवि शान्तिसौख्यद कुटी राजाचिया मन्दिरा

होवो आमरण प्रवास जगिंचा सारा तुझ्या सङ्गतीं
कर्तव्यें भवि आचरूं सकल तीं, सम्पादुं या सद्गती

५६२८

## श्रीशारदे !

[ वृत्त-गीतिका ]

प्रतिकूल घोर परिस्थिती भंवतीं परी न जुमानिली
पथिं कण्टकांसम सङ्कटें किति ! ना क्षिती मनिं मानिली
भव-ताप-तप्त जिवास माउलि ! साउली गमसी खरी
धरुनी मनीं दृढ भाव पाउल ठेविलें तव मन्दिरीं

कुणि दूर लोटिति हे इथें मजला परन्तु उपेक्षुनी
गणिली मिरास जरी कुणी, तव सत्कृपा समतागुणी !
तिळमात्र खन्त न ! काढुनी निज मार्ग निर्भय चालला
तव भक्त निस्पृह हा पहा तुझिया पदाम्बुजिं ठाकला !

नच वाञ्छितों गुणगौरवा जनमान्यता धनसम्पदा
सुखराशि ऐहिक या अशाश्वत मानितों तृणशा सदा
मतिमन्द छन्द धरी तुझा, दिनरात्र चित्त विलोभलें
नवशान्तिसौख्य शुभास्पदे ! तव पादसेवनिं लाभलें

मनिं सूर जे घुमले तुझे जनिं तेच आळविलें मुदें
विनवी तुला, मज गावया हृदयांत धीर असाच दे !

# प्रथम चरणांची सूची


| | पृष्ठ |
|---|---|
| अखण्ड एकच कां हा सुचे तुला चाळा ? | २९ |
| अङ्गीं चर्चियली गोमटी उटी चन्दनाची | ४९ |
| आनन्दी मननन्दिनी विहरते प्रेमामृतस्यन्दिनी | २१ |
| आयुष्याची आधिदेवता किशोर मूर्ति प्रेमाची | ४६ |
| आला हा गुढिपाडवा सण नवा आनन्ददायी महा | ६२ |
| आवडे तूझा गडे ! हा वर्ण काळासांवळा | ५० |
| आशा अन्धुकही जिवास दुबळ्या होते जगाया पुरी | ५३ |
| एकान्तीं मज देखुनी अवचिता मद्भाव तूं जाणुनी | ३८ |
| कालाब्धीचे तरळ उसळतां तरङ्ग उत्तुङ्ग | ४७ |
| कांहिं ना माझें जगीं या सर्व जें तूझेंच तें | ३० |
| कां हा वेष मलीन दीन ? हंसरी वृत्ती विनोदी कुठें ? | २८ |
| खुली खैरात इश्काची लुटायाला खुमारीची | ५९ |
| गरीबांची वणवण | ७२ |
| गळ्याभोवतींचा हात | ७६ |
| घेतली धांव पायीं तार वा मार देवा ! | १८ |
| चल हाण बळें निन्देचे निष्ठुर घाव | ७१ |
| चार अक्षरें तीं जादुचीं तुझिया नांवाचीं | ४० |
| जग दुटप्पी दुहेरी | ७५ |
| जग बहुरूपें रङ्गें | ७७ |
| जल्सा ऐन भरांत ! रङ्ग चढला, हें चित्त हेलावलें | ७० |
| जादूगार जगास हा झुलवितो प्रेमाच कां एकला ? | ३५ |
| जिवास कृष्णसख्या ! बांसरी तुझी रमवी | ५७ |
| जीवाधार जगांत एकच मला प्रेमी सखा लाभला | ६८ |
| झुले चटकचान्दणी चमचमा नभःप्राङ्गणीं | २४ |

| | पृष्ठ |
|---|---|
| झोंके घेत कुणी बालिका झोंपाळ्यावरती | २२ |
| तुझे तापदायी हे स्वरालाप कोकिळे ! | ६० |
| तेजस्वी अति हीं मनोहर किती ताराफुलें साजरीं | २० |
| तेतिस करोड बन्धू आम्ही पन्थ निराळे जरि अमुचे | ६६ |
| थाटोनी चिमणाच भातुकलिचा संसार तेव्हां मला | ४३ |
| देखोनी बहुता दिनीं तुज गडे ! आनन्दलें मन्मन | ४५ |
| देवाजिचा कृपावर हा थोर आगळा | ३४ |
| नाचती ओंठावरी हे बोल वेड्या प्रीतिचे | ३१ |
| नाहीं फार जरी प्रवास जगतीं माझा असे जाहला | ५४ |
| ' नाहीं हृद्य रसाळ सद्गुणवती विद्वन्मनोमोहिनी ' | ६९ |
| निष्फळ गेला क्षण न परत ये सुटला वाऱ्यावर बाण | ५६ |
| न्याय दया प्रीती स्वार्थ परमार्थ | ७९ |
| पटला साक्षात्कार मनाला टीकाकार न तू | ६५ |
| पाजले पेले विषारी क्रूर दैवानें मला | ३६ |
| पोर हट्टी नि छान्दिष्ट | ७३ |
| प्रतिकूल घोर परिस्थिती भंवतीं परी न जुमानिली | ८२ |
| प्रभो ! हा संसार अखण्ड आजन्म | ८० |
| प्राजक्त मोगरींचा झेला कळ्याफुलांचा | ३२ |
| प्रीतिच्या प्रान्तांत साचें राज्य नान्दे तें मुक्यांचें | ३३ |
| प्रीतिचे किति खेळ खेळुनि ते तसे नटचञ्चले ! | ४८ |
| फुले गुल्जार इश्काचा बगीचा गार दिलप्यारा | ५८ |
| बाला काव्यकला-विलास-चतुरा तूं प्रेमला निर्मला | २७ |
| भरला दरिया तुफान तुम्बळ खवळे हृदयाचा भारी | ३७ |
| मानी ताठ वृत्तिचा बहु असे मी स्वावलम्बी पुरा | २५ |
| म्लानवदन जड शून्य मनें कां सुधाकरा ! श्रमशी ? | ५१ |

| | पृष्ठ |
|---|---|
| या जन्मीं घडला वियोग अपुला दैवें प्रिये ! कायम | ४४ |
| रङ्ग जगाचे देखून | ७८ |
| रस्त्यानें रडक्या जगीं रडखतां दृष्टी तुवां वेधिली | ३६ |
| वेडे कैक पतङ्ग दीपकळिला ज्यांनीं जिणें वाहिलें | ६७ |
| सखये ! सजलों तुझिया स्तवना | २३ |
| सदा खिशावरी डोळा | ७४ |
| सौख्याशा जळली ! जगांज कसलें तें श्रेय सम्पादणें ? | ४२ |
| सौख्यें ऐहिक पारलौकिक तशीं सम्पादुनी सोज्वळ | ६३ |
| सौन्दर्यें भंवतीं किती विनटलीं साकार हीं पाहुनी | ४१ |
| सौन्दर्य दिव्य तव गोण्डस गोजिरें बा ! | ५५ |
| सौन्दर्यवैभवाच्या जीच्या सुदिव्य तेजें | ६१ |
| संसारसन्तापसंहारकर्त्री चिरं सौख्यदात्री महन्मङ्गला | १७ |
| स्वच्छन्दी फुलपांखरूं मन रमे सेवी सुधामाधुरी | १९ |
| स्वार्थी साधुनि शेवटीं फसविले भोळ्या जिवाला खला ! | ५२ |
| ‘ हा संसार असार दुक्खद निका सारा पसारा फुका ’ | ८१ |
| हांसऱ्या नेत्रांत भासे तेज जादूचें झळाळे | ३९ |
| हृदयप्रान्तीं निर्मळ निर्झर वाहे काव्याचा | ६४ |

**वृत्तपत्रांनीं वाखाणलेला, परीक्षकांनीं प्रशंसिलेला लोकप्रिय वैशिष्ट्यपूर्ण संग्रह**

लेखक
श्री. स. अ. शुक्ल

# ] भरारी [

प्रस्तावना लेखक
श्री. वि. सी. गुर्जर

...श्री. शुक्ल यांची विनोदीबुद्धि बरीच तीक्ष्ण असल्याचा पुरावा त्यांच्या नाट्यछटामध्यें आणि ' छबी ' ' भले महाराज ' या सारख्या गोष्टींत दिसून येतो. ' कल्पनेचा आजार ' या गोष्टींतील उत्तरार्ध तर फारच बहारीचा व विनोदी आहे. समाजजीवनांतील हृदयस्पर्शी चित्रें रेखाटण्यांतहि शुक्लांचा हातखंडा आहे.

—नवाकाळ

...नाट्यछटा तंत्रदृष्ट्या निर्मळ असून परिणामाच्या दृष्टीनेहि सुंदर आहेत. ...श्री. शुक्लांची भाषासरणी ओघवती, अनुप्रासयुक्त, चटकदार आहे. नाट्याप्रमाणेंच ललितवाङ्मयाच्या इतर प्रांतांतहि श्री. शुक्ल यांच्या हातून आपल्या लौकिकाला साजेशीच कृति निर्माण होते हें ' भरारी ' वरून सिद्ध होतें.

—लोकमान्य. ता. २।७।३७

...श्री. शुक्ल यांच्या गोष्टी बऱ्याच मार्मिक असून नाट्यछटाहि मनोरंजक खोचदार आहेत. श्री. शुक्लांच्या या ' भरारी 'नें गगनविहाराचें सौख्य कांहीं काळ तरी खास मिळेल.

—कौमुदी पुणें. २६।७।३७

...' भरारी 'त पहिल्या मानाची जागा ' बळी ' या गोष्टीला द्यावी लागेल. नाट्यछटेंत सुटसुटीतपणा व खटकेदारपणा हे दोन गुण चांगले साधले आहेत.

—विविधवृत्त. ४।७।३७

...शुक्लांच्या नाट्यलेखनाप्रमाणेंच नाविन्य हात्र त्यांच्या प्रस्तुत ' भरारी 'चाहि आत्मा आहे...' भरारीं ' त त्यांची ध्येयवादी, तत्त्वनिष्ठ लेखणी तेजस्वीपणानें तळपली आहे.

—निर्भीड. ता. ३०।५।३७

...या पुस्तकाला पुरणपोळीची उपमा दिल्यास त्यांतील गोष्टी कथानकाच्या चटकदारपणामुळें पुरणासारख्या रुचकर वाटतात...' पुरुषहृदय ' हीच गोष्ट अधिक चटकदार वाटते...

बलवंत, रत्नागिरी. २८।७।३७

...सात्विक मनोरंजनाच्या दृष्टीनें पाहिल्यास संग्रहानें आपलें कार्य फारच चांगल्या तऱ्हेनें केलें असें निःसंशय म्हणतां येईल.

सकाळ, पुणें. २८।६।३७

...सूक्ष्म निरीक्षण बुद्धि, कल्पनेच्या भराऱ्या व उपहासात्मक विनोद हे शुक्लांच्या दीर्घनिबंधांचें वैशिष्ट्य आहे...

—लोकशक्ति पुणें. १८।६।३७

**रामकृष्ण प्रकाशन मंडळ—मुंबई नं. ४.**

REFBK-0005628
REFBK-0005628

# सं गी ति का

[ लोकप्रिय पद्यांचा नोटेशनसह नाविन्यपूर्ण संग्रह ]

सुप्रसिद्ध नाटककार **श्री. सदाशिव अनन्त शुक्ल** यांच्या नाटकांतील विशेष लोकप्रिय पदांचा, त्याचप्रमाणें त्यांनीं खास ग्रामोफोन रेकॉर्डसाठीं रचलेल्या, नामांकित गायकगायिकांच्या गोड गळ्यांतून घरोघर लोकप्रिय झालेल्या, भक्ति, करुण, वत्सलादि विविध रसांतील, विविध रागदारींतील निवडक पदांचा व उत्कृष्ट भावगीतांचा संग्रह प्रस्तुत पुस्तकांत केला आहे. संगीताचार्य **प्रो. कृष्णराव मुळे** यांच्याकडून मुद्दाम करवून घेतलेलें प्रत्येक पदांचे सशास्त्र नोटेशन प्रत्येक पदाखालीं दिलेलें आहे. प्रमुख रागरागिण्यांची व तालांची माहितीहि प्रथम दिलेली आहे. हार्मोनियम, तसेंच, सतार, फिडल्, दिल्रुबा, वगैरे कोणतेंहि तंतुवाद्य शिकूं इच्छिणाऱ्या संगीतप्रेमी रसिकांस हें पुस्तक विशेष उपयुक्त आहे.

**किंमत बारा आणे**

---

**महाराष्ट्राच्या रंगभूमीवर अखंड गाजलेलीं**

**श्री. सदाशिव अनंत शुक्ल कृत**

## — लोकप्रिय संगीत नाटकें —

| | रु. आ. | | रु. आ. |
|---|---|---|---|
| सौभाग्य-लक्ष्मी | १—४ | स्वर्गावर स्वारी | ०-१२ |
| सिंहाचा छावा | १—० | साक्षात्कार | ०-१२ |
| साध्वी मिराबाई | १—० | सत्याग्रही | १—० |

**परचुरे पुराणिक आणि मंडळी बुकसेलर्स मुंबई ४**